# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा


६० वे)    किंमत एक रुपया    (अंक १ ला

एप्रिल १९८१

: कार्यालय :
साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४२२६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

औट हाताचा स्थूल गाडा ।
देहेंद्रियांचा जो सांगाडा ।
तो काय आपुला साई निधडा ।
समूळ सोडा हा भ्रम ॥९६॥

साई म्हणों जरी देहा ।
तरी त्या नांवचि नाहीं विदेहा ।
रुपही नाहीं वस्तूसि पहा ।
रुपातीत श्रीसाई ॥९७॥

देह जरी नाशिवंत ।
वस्तु स्वतंत्र नाशरहित ।
देह पंचभूतांतर्गत ।
अनाद्यनंत निजवस्तु ॥९८॥

त्यांतील शुद्धसत्त्वात्मक ।
ब्रम्हरूप चैतन्य देख ।
जड इंद्रियां जो चालक ।
साई नामक ती वस्तु ॥९९॥

ती तों आहे इंद्रियातीत ।
इंद्रियें जड तीतें नेणत ।
तीच इंद्रियां प्रवर्तवीत ।
चाळवीत प्राणांतें ॥१००॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४४ वा



आमच्या वाचकांना
हितचिंतकांना
卐 सहर्ष अभिवादन 卐

श्रीसाईलीला आज
साठाव्या वर्षांत
पदार्पण करीत आहे

—संपादक

# अनुक्रमणिका


१) संपादकीय — एकूणसाठ वर्षांची वाटचाल
२) राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज —
३) श्रीकृष्णदास उर्फ सेवक महाराज — श्री. गणपतराव सामंत
४) श्रीसाईबाबांचा जीवन योग — डॉ. सौ. चारुशिला गुप्ते
५) श्रीसाईलीला अमृतानुभव — श्री. रा. ब. बारशी
६) आमचे समाधी मंदिर — सदानंद चेंदवणकर
७) नटनाटकी खेळिया श्रीसाईनाथ — प्रा. र. श्री. पुजारी
८) मंत्रपुष्पांजली व ध्यान श्लोक — ले. कर्नल मु. ब. निंबाळकर
९) नेत्रशिबीर नव्हे नेत्रयज्ञच — कु. रेखा दिघे
१०) श्री. साईबाबांचे दरबारी २५ वर्षे सेवा — कु. रेखा दिघे
११) बाबांच्या हयातीतील पालखीचा सोहळा — सौ. उषा मुळे
१२) शिरडीवृत्त




▲ माननीय श्री. क. हि. काकरे कोर्टरिसिव्हर साहेब श्री साईबाबा संस्थान शिर्डी समारोप प्रसंगी आभाराचे भाषण करीत असतांना.

# एकूण साठ वर्षांची वाटचाल




श्रीसाईलीला मासिकाच्या साठा वर्षाचा हा पहिलाच अंक श्रीसा बाबांच्या परम कृपा प्रसादामु आमच्या वाचकांच्या हाती दे असताना आम्हाला फार आन वाटत आहे. "साठी बुद्धि नाठी" ही म्हण कदाचित माणसांच्या बाब तीत खरी असली तरी ती मासि कांच्या बाबतीत खचितच खरी नाही दीर्घकाळ चालणारे मासिक हे मुर केल्या लोणच्याप्रमाणे अधिकच चविष्ट असते. मासिकाला एक परंपरा असते आणि दीर्घकाळच्या प्रकाशनाने त्याला एक प्रकारची प्रतिष्ठाही प्राप्त झालेली असते. दी काळच्या परंपरेने मासिकाकडून वाचकांच्या बऱ्याच अपेक्षा असतात आणि मग त्य पुऱ्या करण्याचे अत्यंत जबाबदारीचे काम संपादकावर पडत असते. म्हणून अश प्रकारच्या दीर्घकाळ चाललेल्या व उज्वल परंपरा असणाऱ्या मासिकाचा संपाद होणे हे जसे भाग्याचे त्याचप्रमाणे मोठ्या जबाबदारीचेही काम असते.

आजच्या जगात आपल्याला अनेक प्रकारची नियतकालिके प्रसिद्ध होताना दिसतात. त्यामध्ये दैनिकांपासून वार्षिकापर्यंत सर्वांचा अंतर्भाव होतो. ही नियत- कालिके एकाच ध्येयाने अथवा उद्देशाने निघालेली नसतात आणि त्याचमुळे त्यात छापून येणारा मजकूरही फारच विविध प्रकारचा असतो. दैनिके बातम्यांना प्राधान्य देतात आणि त्यामुळे त्यात भारदस्त विषयांवरील लेख फारच थोडे येतात. बातमी ही क्षणाक्षणाला ताजी असते, व क्षणाक्षणाला शिळी होते. त्यामुळेच मग सकाळी निघालेले दैनिक दुपारला शिळे होते आणि ताज्या बातम्यांसाठी भुकेलेले वाचक दुपार होताच सायंकाळच्या वर्तमानपत्रांची प्रतीक्षा करू लागतात! अर्ध साप्ताहिके, साप्ताहिके ह्यात बातम्यांना मुळीच स्थान नसते असे नाही त्यामुळे ह्या नियतकालि- कातून बातम्या इतकेच महत्व लेखानाही असते. ह्यानंतर पाक्षिके, मासिके, द्वैमासिके, त्रैमासिके, षण्मासिके व वार्षिके ह्यांचा विचार करावा लागतो. ह्या सर्व नियतकालि- कातून बातम्यांना अभावानेच स्थान मिळत असते तर वैचारिक लेख व करमणूक-

प्रधान साहित्य हेच ह्या नियतकालिकातून विशेषेकरून प्रसिद्ध होत असते. ह्या नियत-कालिकातून प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या विषयाची विविधताही पहाण्यासारखी असते. राजकीय पक्षांची मुखपत्रे असणारी नियतकालिके पक्षीय राजकारणाचा सतत पुरस्कार करीत असतात. नाटकाला, शेतीला, धंद्याला, सिनेमाला, खेळांना, वाङ्मयाला अर्थकारणाला, स्त्रियांच्या प्रश्नांना अशा प्रकारे वाहिलेली मासिके त्या त्या प्रश्नांचा ऊहापोह करणारे लेख छापीत असतात आणि शेवटी तत्वज्ञान, धर्म, भक्ति अशा विषयांच्या प्रचारासाठी प्रसिद्ध होणारी थोडीशी नियतकालिके असतात आणि त्यांचा खपही असावा तसा फार मोठा नसतो. शिर्डी संस्थानतर्फे प्रसिद्ध होणारे 'श्री साई-लीला' मासिक ह्या शेवटच्या वर्गात मोडते.

श्रीसाईलीला मासिकाच्या एकूणसाठ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीचा इतिहास मोठा मनोरंजक असला पाहिजे व तो यथावकाश लिहिला जाईलच; पण येथे तो समग्र देता येण्यासारखा नसल्यामुळे ह्या मासिकाचे उद्देश काय होते आणि त्यातले किती सफल झाले ह्याचाच आढावा साठाव्या वर्षात पदार्पण करण्याच्या वेळी करणे इष्ट होईल. श्री साईबाबांनी १९१८ साली समाधी घेतल्यानंतर श्री साईबाबांच्या आशीर्वादाने ज्याच्या लेखनाला कै. अण्णासाहेब दाभोलकरांनी सुरवात केली होती ते साईसच्चरित लिहून पुरे झाले होते. श्री बाबांच्या संबंधीचे काही भक्तांचे अनुभव त्यात ग्रथित झाले होते; पण श्री बाबांच्या असंख्य भक्तांना हरघडी बाबांच्या लीलांचे, आशीर्वादाचे व कृपेचे अनुभव येत होते व तेही कोठे तरी प्रसिद्ध करून इतर भक्तांच्या माहितीसाठी रुजू करणे आवश्यक होते. त्या काळी शिर्डी संस्थान विश्वस्तांच्या ताब्यात होते तेव्हा त्यांनी विचार विनिमय करून "साईलीला" ह्या नावाचे मासिक प्रसिद्ध करण्याचे ठरविले व त्याचा प्रथम अंक चैत्र शुद्ध प्रतीपदा (पाडवा) शके १८४५ (इ. स. १९२३) ला प्रसिद्ध केला! हीच श्री साईलीला मासिकाची सुरवात होय. हा पहिला अंक केवळ बत्तीस पानांचा होता व त्यावर किंमत छापलेली नव्हती; पण मासिकाची संकल्पित वार्षिक वर्गणी केवळ तीन रुपये सहा आणे (पोस्टेज सह) होती. हा प्रथम अंक सर्वसाधारण त्या काळी माहीत असलेल्या सर्व साईभक्तांना नमुना अंक म्हणून पाठविण्यात आला होता व त्यांना वर्गणीदार होण्याची विनंति करण्यात आली होती तसेच पुढील अंक व्ही. पी ने रवाना होईल असेही कळविण्यात आले होते. ह. भ. प. श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काका महाजनी ह्यांचे नाव ह्या अंकावर संपादक म्हणून छापलेले आहे. तर ह. भ. प. रामचंद्र उर्फ बाबासाहेब तर्खड यांनी टर्नर रोड बांद्रे येथून तो प्रकाशित केला. यंदाच्या- कवी-लेखकांच्या सातव्या वार्षिक संमेलनाच्या

अध्यक्षा सौ. सरोजिनीबाई मुळये ह्या ह्याच महाजनींच्या कन्या होत. हा योगाही मोठा अकल्पितच म्हटला पाहिजे.

प्रस्तुतचा श्री साईलीला मासिकाचा पहिला अंक कोणा जुन्या साईभक्ताने जपून ठेवला असल्यास न कळे; परंतु तो शिर्डी संस्थानच्या शिर्डी येथील वाचनालयात काळजीपूर्वक जपून ठेवण्यात आला आहे व मंदिरप्रमुख श्री. बागवे ह्यांना भेटल्यास ते तो अंक जिज्ञासूना दाखविण्याची व्यवस्था करतील. ज्या वाचकांना तो पहावयाचा असेल त्यांनी तो श्री. बागवे ह्यांच्याकडे जाऊन पहावा. श्री साईलीला मासिक काढण्याचा उद्देश काय होता हे समजून घेण्यासाठी साईलीलेच्या प्रथमांकाकडे दृष्टिक्षेप करणे आवश्यक आहे. ह्या करिता त्या अंकातील समग्र संपादकीयच पुढे उद्धृत करीत आहोत.

# श्रीसाईलीला मासिक

## वर्ष १ चैत्र शके १८४५ ( १९२३ ) अंक पहिला

या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नावावरून व्यक्त होत आहे. शिर्डीचे श्री साई महाराजांचे भक्त असंख्य असून ते ठिकठिकाणी पसरले आहेत. त्यांना निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव महाराजांनी आपल्या देहावसानानंतर सुद्धा अनुभव देण्याचे चालू ठेवले आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही त्यांनासुद्धा अनुभव येत आहेत. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रुतपूर्व, अतर्क्य आणि अनेक आहेत व त्यांच्या अष्टकातील खालील श्लोकांची सत्यता सर्वांना पटवीत चालले आहेत–

अनेका श्रुतातर्क्य लीलाविलासैः ।
समाविष्कृतेशा न भास्वत् प्रभावम् ॥
अहं भावहीनो प्रसन्नात्मभावम् ।
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथम् ॥ १ ॥

महाराजांच्या सर्व लीलांचा एके ठिकाणी संग्रह होणे शक्य नाही. पण शक्य असेल तेवढा त्यांच्या लीलांचा व त्यांच्या अमूल्य बोध वचनांचा संग्रह करावा, या हेतूने हे मासिक पुस्तक काढले आहे. भावार्थ रामायणात श्रीरामचंद्राला पार्वतीने "तू सर्वज्ञ असताना भ्रांतपणाचे अवलंबन करून तृणपाषाणांना आलिंगन का

होतोस ? " असा प्रश्न केला असता श्रीरामचंद्रांनी जे शब्द उच्चारले आहेत तेच महाराजांना लागू आहेत. श्रीरामचंद्र म्हणाले--

भक्त उद्धारावया कारणें । रडणे पडणे अडखळणें ।
पर्वतीं पर्वती धावणें । आणि आलिंगणे वृक्षासी ॥
उमे जाण तू निश्चित । माझे पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाही ॥

हे शब्द सर्वस्वी महाराजांस लागू आहेत. त्यांचा एकूण एक शब्द व एकूण एक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठी होती, व त्यांचे एक पाऊलसुद्धा व्यर्थ पडत नव्हते. म्हणून त्या लीलांचा व शब्दांचा संग्रह भक्तानाच नव्हे तर सर्व जनतेला हितकारी होईल अशी आमची खात्री आहे.

असा संग्रह करण्याचा थोडासा प्रयत्न झाला आहे व तो या मासिकात 'महाराजांचे अनुभव' व 'श्रीसाईसच्चरित' या मथळयाखाली येईल. यापैकी श्रीसाईसच्चरित पद्यात्मक म्हणजे ओवीबद्ध रचले गेले आहे, व त्याची म्हणजे श्रीसाईसच्चरिताची सुरुवात महाराज देहधारी असतांना त्यांची आज्ञा घेऊन झाली होती. 'महाराजांचे अनुभव' या मथळयाखाली निरनिराळया भक्तांकडून जे अनुभव लिहून येतील त्यांचा संग्रह करण्याचे योजिले आहे. असे बरेचसे अनुभव आमच्या संग्रहात आज आहेत ते या मथळ्याखाली छापले जातील. त्यात काही चुका असल्यास त्या त्या भक्ताकडून दुरुस्ती लिहून आल्यास आम्ही आनंदाने प्रसिद्ध करू. तसेच महाराजांचे भक्ताकडून जे जे अनुभव लिहून येतील त्यालाही सवडीप्रमाणे शक्य तितके स्थळ या मासिकात देऊ. भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच.

समर्थांनी कोणास काही गुप्त रीतीने सांगितले असेल तर ते या ग्रंथात परिस्फुट होण्याचा संभवच नाही. पण त्यांनी उघडे दरबारात सर्वांसमक्ष कोणा एकास उद्देशून जरी काही सांगितले असले तरी ते सर्वांच्या हिताचे असल्यामुळे ते सर्वांची सामाईक कमाई आहे, असे सर्व साईभक्त समजत असले पाहिजेत अशी समजूत आहे आणि म्हणूनच त्यांनी आपले अनुभव लिहून पाठवावे अशी आमची प्रत्येकभक्तास आग्रहाची विनंती आहे.

सारांश, ही सरस्वतीची सेवा आणि ती परम दयाळू श्री साईमाऊलीचे इच्छेने आणि आशीर्वादाने चडत आहे. अर्थात त्या माऊलीची आपल्या भक्तांना वेळोवेळी आठवण होत रहावी हेच या सेवेचे ध्येय आहे.

वर उद्धृत केलेल्या संपादकीयावरून असे दिसून येईल की साईलीला मासिक चालू करण्याचे त्यावेळी मुख्य दोन उद्देश होते. एक म्हणजे अण्णासाहेबांनी लिहिलेले साईसच्चरित क्रमशः प्रसिद्ध करणे व श्रीबाबांच्या संबंधीचे भक्तांचे अनुभव प्रसिद्ध करणे. ह्यांपैकी साईसच्चरित प्रस्तुत मासिकात क्रमशः प्रसिद्ध होऊन आता ते ग्रंथरूपाने मिळते तेव्हा तो उद्देश केव्हाच सफल झालेला आहे. भक्तांच्या अनुभवाबद्दल त्यावेळचे संपादक म्हणतात, "भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच." श्री साईलीला मासिकाचे जे आजचे वाचक आहेत त्यांच्या हे सहज लक्षात येईल की पहिल्या संपादकांचे आश्वासन आजतागायत संपूर्णपणे पाळले जात आहे. साईभक्तीच्या प्रसारामुळे भक्त वाढत आहेत व त्यांचे अनुभवही विविध आहेत तेव्हा त्यांना प्रसिद्धी मिळणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. तेव्हा भक्तांची ही अपेक्षा हे मासिक संपूर्णपणे पुरी करते हे ह्या मासिकाचे वैशिष्ट्य होय. श्री साईलीलाचे सुरुवातीपासूनचे संपादक पुढीलप्रमाणे-

१) श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनी ... इ. स. १९२३
२) श्री. रामचंद्र उर्फ बाबासाहेब तर्खड ... ,, १९२३
३) श्री. रामचंद्र रामकृष्ण सामंत ... ,, १९३७
४) श्री. रामचंद्र वासुदेव वैसास ... ,, १९४१
५) श्री. श्रीधर नारायण खारकर ... ,, १९४३
१९४४ ते १९४७ हा काळ हे मासिक बंद होते.
६) डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर ... ,, १९४७
७) श्री. नागेशराव सावंत ... ,, १९५३ ते १९६०

१९६० साली शिर्डी संस्थानासाठी प्रथमतः कोर्ट रिसीव्हर (न्यायालयधारक) नेमण्यात आला तेव्हापासून पुढील कोर्टरिसीव्हरनी संस्थानचा कारभार पाहिला.

श्री. क्षीरसागर नोव्हेंबर १९६०

| | |
|---|---|
| श्री. दर्प | डिसेंबर १९६२ |
| श्री. पोतनीस | डिसेंबर १९६४ |
| श्री. पाटणकर | जुलै १९६७ |
| श्री. का. सी. पाठक | डिसेंबर १९७० |
| श्री. क. हि. काकरे | मे १९७८ पासून आजतागायत |

श्री साईलीला मासिकाचे महत्व ओळखून वरील सर्व रिसीव्हरसाहेबांनी ते अव्याहतपणे चालू ठेवले व त्याच्या प्रकाशनासाठी लागणारे आर्थिक सहाय्य सतत संस्थानच्या पैशातूनच चालू ठेवले. आजही त्या मासिकाच्या प्रकाशनासाठी शिर्डी संस्थानला जवळजवळ दरवर्षी तीस पस्तीस हजार रुपयांची आर्थिक मदत करावी लागते. कोर्ट रिसीव्हर ह्यांना संस्थानच्या कार्यालयाचे काम भरपूर असते त्यामुळे त्यांना मासिकाच्या संपादनाकडे लक्ष पुरविणे शक्य होत नाही. म्हणून १९२३ पासून साठ पर्यंत प्रत्यक्ष संपादकाचे नाव मासिकावर छापून येत असे त्याऐवजी त्या साला-पासून मुख्य संपादक म्हणून रिसीव्हरसाहेबांचे नाव छापले जात असले तरी प्रत्य-क्षात हे काम कोणीतरी कार्यकारी संपादक नेमूनच करून घेण्यात येते. १९६० सालापासून ह्या मासिकाला कार्यक्षम असे कार्यकारी संपादक मिळत गेल्यामुळे ह्या मासिकाची वाटचाल उत्तरोत्तर प्रगतीपथावर चढत आली आहे. प्रस्तुत मासिकाच्या वाचकांना हे माहित आहेच की १९७४ पासून ह्या मासिकाच्या मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक म्हणून श्री. सदानंद चेंदवणकर व इंग्रजी आवृत्तीचे संपादक म्हणून डॉ. श्री. दि. परचुरे हे काम पहात आहेत.

मासिकाच्या अंतरंगासंबंधी या ठिकाणी थोडेफार लिहिणे अप्रस्तुत होणार नाही. अगदी सुरवातीस हे मासिक संपूर्णतया मराठीत प्रसिद्ध होत असे पुढे यथाव-काश त्यात हिंदी व इंग्रजी लेखांचीही भर घालण्यात आली; परंतु जसजसे लेखक वाढू लागले तसतसे हे मासिक त्या सर्वांचे लेख सामावून घेण्यास असमर्थ ठरू लागले. म्हणून १९७३ साली ह्या मासिकाच्या दोन आवृत्या निघू लागल्या त्यापैकी एक संपूर्ण मराठी व दुसरी इंग्रजी व हिंदी लेखांची. ह्या वेळेपासून मासिकाची प्रगती झपाट्याने होऊ लागली व एप्रिल १९७३ ला जेवढे अंक निघत होते त्याच्या चौपटीहून अधिक अंक आज निघत आहेत, आणि जो जो बाबांच्या भक्तीचा प्रचार वाढत आहे तो तो ही अंकांची वाढ सतत चालूच रहाणार आहे.

१९७३ साली अंकात केवळ ४८ पानेच असत व वार्षिक वर्गणी केवळ सहा रुपयेच होती; पण १९८० सालच्या एप्रिलपासून मासिकाची पृष्ठसंख्या ४८ वरून

६४ वर नेण्यात आली व वार्षिक वर्गणीत अपरिहार्य अशी थोडी वाढ करून ती दहा रुपये करण्यात आली. अर्थात् बाजारात मिळणाऱ्या अन्य मासिकांच्या मानाने ही वर्गणी पुष्कळच कमी आहे; परंतु बाबांच्या भक्तीचा प्रचार हेच मासिकाचे ध्येय असल्यामुळे ही अल्प वर्गणी अशीच पुढे चालू राहील.

१९७५ सालापासून मासिकात लिहिणाऱ्या कवी व लेखकांचे एक संमेलन प्रतिवर्षी शिर्डीस भरत असते. त्यात होणाऱ्या विचारविनिमयामुळे मासिकात सुधारणा करणे व त्याचा दर्जा वाढविणे ही दोन कामे अधिक जोमाने हाती घेतली जातात. ह्या दोनही आवृत्त्यांच्या वाचकांकडून जी पत्रे संपादकांकडे येत असतात त्यावरून प्रस्तुत मासिकाचा दर्जा फार वरचा आहे, असे म्हणाल्यास त्यात अतिशयोक्ति आहे असे मुळीच नाही.

मासिक चालविणे हे एका माणसाचे काम नाही. लेखकांनी लेख पाठविले पाहिजेत. भक्तांनी मोठ्या प्रमाणावर वर्गणीदार झाले पाहिजे, संपादकांनी सर्व मजकूर वेळेवर छापखान्यात पाठविला पाहिजे म्हणजे मासिक वेळेवर निघते व वाचकांना ते वेळेवर पोचते. प्रस्तुत मासिकाची वाट कित्येक भक्त किती आतुरतेने पहात असतात हे त्यांच्या बोलण्यावरून वारंवार स्पष्ट होते. तेव्हा साईबाबांचा ज्या ह्या मासिकास संपूर्ण आशीर्वाद आहे ते हे मासिक श्री साईभक्तांच्या सेवेसाठी सतत प्रसिद्ध करण्याचे आश्वासन वरील सर्वांच्या सहकार्याने व साईबाबांच्या आशीर्वादाने आम्ही ह्या ठिकाणी देत आहोत व ही सेवा बाबांनी आमच्याकडून सतत करून घ्यावी अशी त्यांच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना करीत आहोत.

## चुकीची दुरुस्ती

श्रीसाईलीला मार्च ८१ अंकात श्रीसाईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलनाचा संपूर्ण वृत्तांत देण्यात आलेला आहे. या वृत्तांत लेखात पान क्रमांक २० वर १६ व्या ओळीत स्वागतगीत श्री. बाळ चावरे यांनी गाईले असे छापले गेले आहे. वास्तविक हे स्वागतगीत परळचे साई भक्त गायक श्री. श्रीराम सातर्डेकर यांनी गाईले असे हवे होते. झालेल्या या नजर चुकी बद्दल आम्ही दिलगीर आहोत—का. सं.

६४ वर नेण्यात आली व वार्षिक वर्गणीत अपरिहार्य अशी थोडी वाढ करून ती दहा रुपये करण्यात आली. अर्थात् बाजारात मिळणाऱ्या अन्य मासिकांच्या मानाने ही वर्गणी पुष्कळच कमी आहे; परंतु बाबांच्या भक्तीचा प्रचार हेच मासिकाचे ध्येय असल्यामुळे ही अल्प वर्गणी अशीच पुढे चालू राहील.

१९७५ सालापासून मासिकात लिहिणाऱ्या कवी व लेखकांचे एक संमेलन प्रतिवर्षी शिर्डीस भरत असते. त्यात होणाऱ्या विचारविनिमयामुळे मासिकात सुधारणा करणे व त्याचा दर्जा वाढविणे ही दोन कामे अधिक जोमाने हाती घेतली जातात. ह्या दोन्ही आवृत्त्यांच्या वाचकांकडून जी पत्रे संपादकांकडे येत असतात त्यावरून प्रस्तुत मासिकाचा दर्जा फार वरचा आहे, असे म्हणाल्यास त्यात अतिशयोक्ति आहे असे मुळीच नाही.

मासिक चालविणे हे एका माणसाचे काम नाही. लेखकांनी लेख पाठविले पाहिजेत. भक्तांनी मोठ्या प्रमाणावर वर्गणीदार झाले पाहिजे, संपादकांनी सर्व मजकूर वेळेवर छापखान्यात पाठविला पाहिजे म्हणजे मासिक वेळेवर निघते व वाचकांना ते वेळेवर पोचते. प्रस्तुत मासिकाची वाट कित्येक भक्त किती आतुरतेने पहात असतात हे त्यांच्या बोलण्यावरून वारंवार स्पष्ट होते. तेव्हा साईबाबांचा ज्या ह्या मासिकास संपूर्ण आशीर्वाद आहे ते हे मासिक श्री साईभक्तांच्या सेवेसाठी सतत प्रसिद्ध करण्याचे आश्वासन वरील सर्वांच्या सहकार्याने व साईबाबांच्या आशीर्वादाने आम्ही ह्या ठिकाणी देत आहोत व ही सेवा बाबांनी आमच्याकडून सतत करून घ्यावी अशी त्यांच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना करीत आहोत.

## चुकीची दुरुस्ती

श्रीसाईलीला मार्च ८१ अंकात श्रीसाईलीला लेखक–कवी स्नेहसंमेलनाचा संपूर्ण वृत्तांत देण्यात आलेला आहे. या वृत्तांत लेखात पान क्रमांक २० वर १६ व्या ओळीत स्वागतगीत श्री. बाळ चावरे यांनी गाईले असे छापले गेले आहे. वास्तविक हे स्वागतगीत परळचे साई भक्त गायक श्री. श्रीराम सातर्डेकर यांनी गाईले असे हवे होते. झालेल्या या नजर चुकी बद्दल आम्ही दिलगीर आहोत—का. सं.

जयंतीनिमित्य पुण्यस्मरण

# राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

आम्ही स्वराष्ट्रसंत। करू राष्ट्रभू स्वतंत्र

—स्वातंत्र्य शाहीर



ब्रह्मलीन राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज म्हणजे महाराष्ट्राची महात्मता, विदर्भाचे विद्युत्‌केन्द्र व गुरूकुंजाची गुरूकिल्ली होत. महाराज मूळचे अमरावती जिल्ह्यांतील स्वातंत्र्यसंग्राम भूमि यावली या गावचे, तेथे त्यांचा जन्म ब्रम्हभट्ट श्री. बंडोजीपंत यांच्या पोटी २९ एप्रिल १९०९ मध्ये गुरुवारी झाला. आकोटकर महाराज, माधानच्या मोहोड वंशातील ब्रम्हीभूत बालान्ध गुलाबराव महाराज आदींनी त्यांना आरंभी अवलोकन करून आशीर्वाद दिला. त्यांचे प्राथमिक विद्याजीवन, यावली, चांदूर बाजार व वरखेड येथे व्यतीत झाले. वरखेड हे त्यांच्या मामाचे गाव. तेथेच आर्वीचे आडकुजी वयाच्या ६४ व्या वर्षी अवलिया अवस्थेत आले. त्यांची व तुकडोजींची पहिली वहिली दृष्टादृष्ट तेथेच झाली. आडकुजी महाराजांच्या आध्यात्मिक तालमीत तयार झाल्यावर असहकारितेच्या आगेमागे त्यांनी रामटेक, चिमूर, गोंदाळा आदि वनविभागात विहार केला. तेथे थंडी वारा, ऊन, पाऊस यांची तमा त्यांनी बाळगली नाही. योगीजनाकडून योगविद्या आत्मसात केली. चांदा जिल्ह्यात जंगलात 'माणिक देव बाबा' म्हणून ते प्रथम प्रसिद्धीस आले. त्यांची आरंभीची आस्वाद्य हिंदी भजने तेथेच प्रथम प्रकाशित झाली. त्यांना ब्रम्हानंदी वळण होते. त्यांचे पूर्वज

शिवकालीन कवी भूषणभट्ट यांच्या वंशातील असल्यामुळे ते कसलेल्या कवीप्रमाणे कवने करीत. हिंदी इतकेच महाराष्ट्र भाषा मराठीवरही त्यांचे प्रभुत्व प्रत्ययास आले. 'श्रीमत् आडकुजी पदा भज मना मग जन्म नाही कदा' हे त्यांचे गुरुस्तवनाष्टक. त्यांच्या बालपणीच वरखेडवासी यांना मुखोद्‌गत झाले होते. इ. स. १९२१ चे कार्तिक पौर्णिमेला त्यांचे स्फूर्तिगुरू समर्थ आडकोजी महाराज वरखेडला अनंतात विलीन झाले. त्यावेळी 'प्राण सद्‌गदित कंठ जाहला' हे गुरुचरित्रात्मक मृत्यूगीत त्यांनी भावनेच्या भरात लिहिले त्यावरून त्यांच्या आरंभीच्या अभिजात कवित्वाची साक्ष पटते.

संतभूमि तेलंगरायाची आर्वी हे तुकडोजींच्या गुरुदेवांचे जन्मगाव असून आडकूजींना अवलिया अवस्थेत आणणाऱ्या संत मायबाईचा मठ तेथेच आहे. इ. स. १९२५ च्या दसरा दिवाळीच्या दिवसात आर्वी येथे काकड आरतीच्या निमित्ताने हिंदुमुसलमानांचे धार्मिक रणकुंड पेटले. अशा अवसरी काहीशा अवलिया अवस्थेत महाराज आर्वीत येऊ लागले. त्यावेळी नदीकाठी असलेल्या अवघडनाथ परिसरातील जोहरी पुऱ्यात गुरुकुंज निवासी आजचे वयोवृद्ध श्री रामचरण लाला यांचेकडे ते वास्तव्य करीत. त्या अर्ध अवलिया अवस्थेतील 'घे करुणा, रुक्मिणी रमणा' 'ऐसा है नाम तेरा' आदि आरंभीची उत्स्फूर्त कवने आर्वीकरांना आजही आठवतात. चिमूर हिंदी भजनावलीनंतर इ. स. १९३६ च्या सुमारास आर्वीच्या तैलंग मुद्रणालयातच त्यांची 'अनुभव प्रकाश' व 'अनुभवसागर' ची पहिलीवहिली प्रत प्रकाशित झाली. महाराजांची मोहक वाणी घरोघरी आळविली गेली. जशी त्यांची काव्यकलाकृति तशीच त्याची स्फूर्तिदायक मूर्ती इ. स. १९३५ च्या महाराजांनी आयोजित केलेल्या सालबर्डी येथील प्रचंड यज्ञसमारंभानंतर विश्रांतिकाळ लोटल्यावर महाराजांची आकृति प्रकृति अधिकच आकर्षक दिसू लागली. तो भव्यदिव्य उंचपुरा आजानुबाहु देह, ती मोहक मिशी, ती स्मितमुखी मुद्रा, मायेच्या माणसाच्या अंगाखांद्यावरून हात फिरवण्याची हातोटी. सर्वच काही लोकविलक्षण. खंजिरी मंजिरीचा खणखणाट मोठमोठ्यांना मंत्रमुग्ध करीत मोहरला. १९३६ साली सेवाग्राम वर्धा परिसरात वास्तव्यास आलेल्या महात्मा मोहनदासांच्या मनालाही मोहित करू शकली महाराजांची मोहक काव्यवाणी.

गतिशीलता हे महाराजांच्या व्यक्तित्वाचे वैशिष्ट्य. प्राप्त परिस्थितीशी ते सहज समरस होत. एखादी गोष्ट मनात आणली की क्रांतिकारक बदल ते तात्काळ करीत. महात्माजींच्या परिसरातील सूत कातण्याची कला त्यांनी तेथेच आस्थेने आत्मसात

...ली. पोषाख पेहरावात पूर्णपणे परिवर्तन घडले. तेव्हापासून महाराज मृत्यूपर्यंत ...खंड खादीधारीच राहिले. महात्माजीनंतर त्यांचे आध्यात्मिक अनुयायी संत विनोबा-...मवेत भूदान आंदोलनात वाटचाल त्यांनी केली. एवढेच नव्हे तर आदर्श ग्राम-...चनेचे मंत्र व तंत्र निर्माण केले. त्यासाठी ग्रामगीतेसारखी ग्रामसंहिता प्रयत्नपूर्वक ...काशात आणली. स्वातंत्र्यपूर्व काळात १९४२ च्या चलेजाव चळवळीत आष्टी-...मूर आदि विभागात भजन भाषणांचा भडिमार करून स्वातंत्र्य रणकुंड चेतविले ... स्वतःही काही काळ कारावास पत्करला.

महाराजांचे वाङ्मय वाचनीय आहे. त्यांचे निवडक प्रभावी पद्यवाङ्मय ध्वनि-...द्रित झाले आहे. जपानसारख्या परदेशातही त्यांची खंजरी खणखणाली. तेथील विश्वधर्मपरिषदेत. “ हर देश में तू हर भेष में तू तेरे नाम अनेक तू एकहि है ” हे गीत त्यांनी अनेकांना ऐकविले. प्रासंगिक कवने करण्यात त्यांचा हातखंडा असे. नागपुरात विशाल शोकसभेत महात्माजींच्या मृत्यूसमयी ‘ दयामयी अवतार शांतिका भारतसे खो गया अंधेरा जिधर उधर छा गया ’ या गीताने कारुण्याचा कळस केला. तसेच १९५७ च्या डिसेंबरात समाजवादी संत गाडगे बाबा गेले. तेव्हा त्यांच्या तेरवीला त्यांनी अमरावतीला लाखो लोकांना आपला आर्त आवाज ऐकवला त्यावेळी

‘ सुनी खबर की संत गाडगे बाबा हमको छोड गये,
धडक भरी छाती में हमको पलभर तो नहीं होश रहे ’

हे मृत्युगीत साभिनय एकतानतेने म्हणून अनेकांच्या डोळ्यात आसवे आणली. स्वातंत्र्यपूर्व काळात ते मुंबईत वत् संस्थान विभागात असताना त्यांच्या वाणीने संतकवि दासगणूना मंत्रमुग्ध केले. ‘ जौहरी जाने हीरेकी परख ’ किंवा ‘ गुणी गुणिनं वेत्ति ’ या न्यायाने दासगणूनी त्यांच्या काव्याचे व कार्याचे यथायोग्य मूल्यमापन पुढील पंक्तीत केले आहे.

‘...कर्म भक्ति ज्ञानाच्या तुकड्या तुकड्यांनी पाहिले
अतीशय वाईट त्या वाटले
निजकाव्य शक्तिचा दोरा घेऊनि करी
ओविले तिघांना त्या दोऱ्या भीतरी
ही केली प्रथमचि उचित गोष्ट भूवरी
तुकडोजींच्या काव्यरसाला मन्मन मोहावले,
गणूने प्रथमचि त्या पाहिले ’

त्यांची उत्स्फूर्त काव्यवाणी हीच त्यांची अमर करणी. आधुनिक साहित्यिका प्रमाणे त्यांनी नियमितपणे स्फुट निबंध लेखन केले. आपल्या गुरूच्या स्मरणार्थ १९४३ साली काढलेल्या 'श्रीगुरुदेव' मासिकात ते आयुष्याच्या अखेरपर्यंत अखंड पणे लिहीत होते. भजनाप्रमाणेच त्यांची भाषणे-प्रवचने श्री गुरुदेव प्रकाशनाने प्रकाशात आणली. अनेक मातब्बरांनी त्यांच्या व्यक्तित्वाच्या व कर्तृत्वाच्या पैलूवर प्रकाश पाडला. अशा मूल्यमापनात्मक लेखांचे 'राष्ट्रसंत व्यक्तित्व व कर्तृत्व' नावाचे पुस्तक त्यांच्या ५२ व्या वाढदिवशी प्रकाशित झाले आहे. विदेशात वाचले जावे म्हणून त्यांच्या निवडक लेखांचा इंग्रजीतील अनुवाद पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे एवढेच नव्हे तर एक इंग्रजी चरित्रहि त्यांच्यावर अलीकडे प्रसिद्ध झाले आहे.

## आयुष्याची अखेर

महाराज महामना मानव होते. त्यांच्या गुरुदेवांच्या गुरू आर्वीच्या संत मायबाई यांच्या मठात मार्गशीर्ष महिन्यात वद्य त्रयोदशीच्या आगे मागे त्यांचे परलोकवासी पुण्यश्लोक पुत्र पांडुरंग महाराज यांच्या पुण्यतिथीचा महोत्सव संत मायबाईनीच सुरू केला होता. तो गेल्या दीडशे वर्षांपासून सातत्याने आजतागायत होत आला आहे. आपल्या आजेगुरूची आठवण ठेवून अलीकडे आयुष्याच्या अखेरपर्यंत या महोत्सवास प्रति काल्याच्या प्रसंगी उपस्थित राहून भजन भाषणादिकांच्या द्वारा महाराज बहुजनास बोध देत. इ. स. १९६७ सालच्या काल्याला महाराजांचे दोन कृपांकित संत श्री अच्युत महाराज व श्री बाबा महाराज हेहि महाराजांच्या समवेत उपस्थित होते. तिथेहि प्रभावीपणे काल्यावर बोलले. या संतत्रयांच्या संगमाची ही अखेर ठरली. इ. स. १९६२ च्या मे मध्ये महाराजांना अन्य कार्यक्रमासाठी आर्वीस यावे लागले. त्यांनी त्यावेळी मायबाईनी मठाचे अखेरचे निरोप दर्शन मनोमन घेतले. पुढे आषाढी वारीच्या वेळी पंढरपुरात त्यांनी अखेरचे भजन मनसोक्त केले. त्यांना यमाची चाहूल लागली होती. पावसाळयाच्या प्रारंभी ते बॉम्बे हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी गेले. व्यथेचे कॅन्सर नाव जाहीर झाले. पोळयाच्या पाडवा ते गुरुकुंजात परतले. गाठी भेटीचा गर्दीचा महिना लोटला. अखेरीस आश्विन वद्य पंचमीला शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास महाराज ब्रम्हलीन झाले. तो दिवस ११ ऑक्टोबर १९६८ हा होता. महाराजांच्या २८ एप्रिल रोजी येणाऱ्या जयंती-निमित्य त्यांना कोटी कोटी प्रणाम.

# श्रीकृष्णदास उर्फ सेवकमहाराज

-श्री. गणपतराव सामंत, एम. ए
व्यवस्थापक-श्रीमहालक्ष्मी, मंदिर मुंबै

● रेवसवरून रामराज्यकडे एस. टी. ने जात असताना चौल थांबा लागतो. ...च पौराणिक श्रीदत्तमंदिर आहे. चौलला उतरून साडेसातशे पायऱ्या चढल्यानंतर श्रीदत्तमंदिर येते. तेथेच श्रीकृष्णदास उर्फ सेवक महाराज एका काळी राहात असत. ...धारण १९६० च्या सुमारास पहाटेच मला स्वप्न पडले व चौलच्या दत्तमंदिरात ...ण्याची प्रेरणा झाली. श्रीसाईबाबांची आज्ञा समजून मी व माझे साईमित्र दुसरे ...दवशी निघालो. साधारण दुपारी १२ च्या सुमारास चौल येथे उतरलो. पहिलीच ...ट. मार्ग ठाऊक नव्हता. इतक्यात आमच्याच बसमधून एक पुजारी उतरले ते ...ाई-घाईने चालत होते. आम्हाला तहान लागली होती. जवळपास कोणी दिसत नव्हते ... आता काय करावे याबद्दल चर्चा करीत चाललो असताना धावपळीने चाललेले ...पुजारी भेटले. आमचे संभाषण त्यांनी ऐकले होते. ते म्हणाले आपल्या मागून चला ... मंदिरात पोचल्यावर तुम्हाला कसलाच प्रश्न येणार नाही. रस्त्यात पाणी मिळणार नाही. साडेसातशे पायऱ्या चढताना आम्हाला ब्रह्मांड आठवले. पण भक्तिमार्गात ...माघार शब्द मला ठाऊक नव्हता तशात श्रीसाईबाबांची प्रेरणा.

श्रीदत्तमंदिरात पोचल्यावर आम्ही पुजाऱ्यास विचारले व त्यांनी जवळच्याच मठीकडे बोट दाखविले. आम्ही त्या मठीत गेलो. एक लंगोटधारी, जटा जमिनीस पोचल्या आहेत, सडपातळ पण ताठ शरीरप्रकृति व भेदक दृष्टी असलेला सत्पुरुष दिसला. समोर गावातील भजनमंडळी तल्लीनतेने भजन करीत होती व आम्ही दोघे त्या मठीच्या कोपऱ्यात दाटीवाटीने बसलो. आमच्याकडे लक्ष जाताच 'इधर आव' असा गंभीर हुकूम आला. आम्हास वाटले की आमची काहीतरी बसण्यात किंवा शिष्टाचारात चूक झाली असावी. आम्ही घाबरतच उभे राहिलो. स्वामीजींनी जवळ बोलाविल्यावर गर्दीतून त्यांच्या पायांना स्पर्श केला. आपल्या जवळचे आसन टाकून व जागा स्वच्छ करून आम्हास जवळ बसवून घेतले.

आम्ही स्वस्थ बसलो. भजन रंगात आले होते. स्वामीजी तटस्थ, तहानेमुळे आम्ही चुळबूळ करीत होतो. इतक्यात स्वामीजींनी सेवकास हाक मारून आम्ही न

मागताच पाण्याचा तांब्या व दोन पेले त्या सेवकाने समोर ठेवले. आज्ञेशिवाय पाणी पिण्याची हिम्मत होईना. महाराज पुढे झाले व तांब्यातील पाणी दोन्ही पेल्यात ओतून आम्हास दिले. पाणी कसले ते सरबत होते, आग्रह करून स्वामीजी सरबत ओतत होते आम्ही पीत होतो. तहान शमली व जणू अमृतच मिळाल्याचे समाधान झाले. भजन मंडळी गेल्यावर जेवणाची काय सोय आहे असे महाराजांनी आम्हास विचारले, अर्थातच आम्ही गावात चहा घेऊन मुंबईस जाणार त्यामुळे जेवण नसले तरी चालेल असे सांगितले, विश्वास ठेवा अगर ठेवू नका साधारण अर्ध्या तासात आमच्या समोर जेवणाची ताटे आली व आम्ही यथेच्छ भोजन केले. कशी सोय झाली हे एक महाराज जाणोत.

महाराजांचे नाव श्रीकृष्णदास महाराज पण त्यांना श्री सेवक महाराज म्हणवून घेणे फारच आवडते. मठीत मुख्य फोटो श्रीसाईबाबा व श्रीदत्त. महाराज स्वतः श्री साईबाबांचे भक्त समजतात. आल्या गेल्यांची स्वतः सेवा करणे त्यांना फार आवडते. इतर साधु सेवा करून घेतात पण श्री सेवक महाराज स्वतः सर्वांची सेवा करतात.

श्री सेवक महाराज हे दक्षिणेकडील एका उच्च कुळात जन्मले पण मनी वैराग्य निर्माण झाल्यामुळे भारतातील पवित्र स्थळी राहून नंतरच ते चौल दत्त मंदिरात आले. ज्यावेळी आले त्यावेळी त्यांच्याकडे थोडेसे चणे-शेंगदाणे होते व त्यावरच त्यांना जवळ जवळ तीन महिने काढावे लागले. कालांतराने स्थानिक भाविकांस श्री सेवक महाराजांची महति कळली व चौल मंदिरात गर्दी होऊ लागली. तेथे येऊन त्यांना आज चाळीसाच्यावर वर्षे झाली. नंतर बरीच गर्दी व्हावयास लागली व त्यांच्या साधनेत व्यत्यय येऊ लागले.

मी त्यांच्याकडे बरेच दिवस जाऊन राहतो पण त्यांचा निरोप मिळाल्याशिवाय तेथून निघत नाही. तेथील मुक्कामात काहीही कमी पडत नाही व विशेषत रात्रीच्या वेळी त्यांच्या सान्निध्यात बसून त्यांच्या गोष्टी ऐकणे म्हणजे खरोखरच धन्य वाटते. महाराजांची साधना जंगलात असते व कोणत्याही क्षणी ते जंगलात जातात व काही तासानी परत येतात.

मी एकदा मुंबईकडून रात्री अकराच्या सुमारास तेथे गेलो. पाऊस पडत होता. त्यात भरपूर अंधार, जंगल असल्यामुळे रस्ता चुकला व पायऱ्या मिळेनात. इतक्यात अंधारातून एका व्यक्तिने विचारले की इकडे जंगलात कोठे, मी सांगितले चौल मंदिरात चाललो. त्यावेळी ती व्यक्ति म्हणाली की तुमचा रस्ता चुकला.

माझ्या मागून या. त्यांनी पहिल्या पायरीवर आणून विचारले पायरी मिळाली का, हो असे उत्तर मिळताच मी त्यांच्या पाठोपाठ पायऱ्या चढू लागलो पण आश्चर्य १०-१२ पायऱ्या चढताच ती व्यक्ती नाहीशी झाली. अर्थातच पायऱ्या सापडल्यामुळे काळोखातून मंदिरात पोचणे कठीण नव्हते. श्रीदत्त मंदिर नजीक येताच सर्पाचा फुत्कार ऐकू आला. तरी न घाबरता श्रीसेवक महाराजांच्या मठीच्या दारावर थाप मारली. मला पाहून श्रीसेवक महाराज म्हणाले 'अरे बेटा ऐसा कैसा आया' मी त्यांना सर्व प्रकार सांगितला. ते म्हणाले तुला श्रीदत्ताने मार्गदर्शन केले व सर्पाचा फुत्कार ही त्याची नंतर जाणीव दिली. तेथे एक प्रचंड पांढरा नाग असून तो रात्री फिरतो. तो संरक्षक आहे. असे श्रीसेवक महाराज म्हणाले, नंतर सकाळी त्यांनी मला त्या नागाचे स्थान दाखविले.

मी त्यांना अनेकदा म्हणतो की बाबा तुम्ही येथे कसे राहाता. 'बेटा जंगल में मंगल' हे त्यांचे ठराविक उत्तर.

नंतर लोकांमुळे व पुढाऱ्यामुळे त्यांना त्रास होऊ लागला व एके दिवशी रात्री त्यांनी चौल दत्तमंदिर सोडले. मी नेहमीप्रमाणे तेथे गेलो तेव्हा कळले की बाबा निघून गेले. तसाच मी गावात आलो व एका जुन्या घराच्या ओट्यावर ऊन असल्यामुळे विश्रांतीसाठी बसलो. एक खेडूत विडी ओढण्यासाठी थांबला. त्याला सहज प्रश्न विचारला व त्याने बाबा कोठे असावेत ते साधारण सांगितले. बऱ्याच चांगल्या लोकांना विचारून जी माहिती मिळाली नाही ती एका खेडूताकडून मिळाली काय ही बाबांची किमया !

नंतर अलिबाग जवळील खंडाळे गावी आलो व तेथून जंगलात तीन तास चालून श्रीसेवक महाराजांच्या आश्रमात आलो. मला पाहताच 'अरे हमारा बेटा आया' असे त्यांनी उद्गार काढले, मी त्यांना काय दिले असेल तर प्रेम व श्रद्धा. ते तेथील श्रीशंकर मंदिराच्या बाजूस राहतात. सर्व डोंगर वस्ती जवळ जवळ नाही व गावात पोचायला तीन तास लागतात. वाहनाची सोय नाही. पण त्या ठिकाणी-सुद्धा कसलीच सोय नाही. 'जंगल में मंगल' या महाराजांच्या शब्दाची आठवण झाल्यापासून राहात नाही.

श्रीसाईबाबांनी निर्वाणापूर्वी 'मी आठ वर्षांनी येईन' असे उद्गार कै. दाभोल-करांकडे काढले याचा उल्लेख साईसच्चरितात आहे. यावर माझे व श्रीसेवकमहा-राजांचे बोलणे होऊन माझा तर्क त्यांनी खरा ठरविला. त्यानंतर अनेक अनुभव घेऊन मी 'त्रैमूर्ति श्रीसाई' हा लेख लिहिला. भक्तिमार्गात अति बुद्धिवाद (म्हणजे शब्दच्छल) चालत नाही. पटेल तर घ्या नाहीतर सोडा. पण वितंडवाद घालू नका.

श्रीसाईबाबांनी पुर्नजन्म घेतला आहे याची प्रचिती हवी असल्यास श्रीसेवक महाराजांना जाऊन भेटा. साधुसंतावर कधीच टीका करू नये. हटयोगी राव पाण्यावरून चालणार होते. सर्व तयारी होती. परदेशातून पथके आली. हटयोगी यास खात्री होती. त्याचवेळी मी श्रीसेवकमहाराजांकडे अल्पशा मुक्कामास होतो. बोलता बोलता मी त्यांना म्हणालो उद्या हटयोगी पाण्यावरून चालणार आहेत. 'ठोका खायेगा' असे त्यांनी तत्क्षणी उत्तर दिले. तसेच झाले व दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी झळकली.

श्रीसेवकमहाराजांकडे सर्वसंगपरित्याग करून एक महिला राहाते. तिला मी व सर्व भाविक 'ताई' या नावाने संबोधतात. बऱ्याच दुर्मिळ औषधांची तिला माहिती आहे. विशेषतः तारुण्यात ज्यांना वेड लागते त्यावर तिच्याकडे औषध आहे. दिवसभर आश्रमात स्वच्छता ठेवणे. आलेल्या अतिथींची सेवा करणे अशी कामे ताई करतात. बाबांच्यासमोर अखंड धूनी पेटत असते व तेथेच श्रीसाईबाबांचा व नवीन अवताराचा फोटो लावला आहे. ताईंना रात्री सहज समाधि प्राप्त होते व हा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला आहे. या दोन्ही व्यक्ति प्रसिद्धीपराङमूख आहेत. माझी त्यांनी बरीच परीक्षा घेतली व आता माझ्यावर मुलाप्रमाणे प्रेम करतात.

श्रीसेवकमहाराज आश्रमातील कामे करत असतात. त्यांची वृत्ती व राहणी रामदासी आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दात प्रेम ओथंबलेले असते. ताईंनी स्वैपाक करावयाचा व महाराजांनी आग्रह करून वाढायचे हा कार्यक्रम चालू असतो. कोणाकडे मागणे नाही. पण जर कोणी त्यांच्याशी बुद्धिवाद केला तर, कशाप्रकारे त्याला थंड बसवतील ते सांगता येणार नाही. तुमची परिक्षा केव्हा व कशी घेतील ते सांगता येणार नाही. चौल श्रीदत्त मंदिरात मुक्काम असताना त्यांचा 'सत्या' नावाचा कुत्रा होता. पण तेथून निघतेवेळी ते अचानक निघाले. 'सत्या' मागेच राहिला. अरण्यातून मार्ग काढीत ते खंडाळे येथील जंगलात आले. काही दिवसानी 'सत्या' तेथे हजर झाला.

लोकोपयोगी कार्य करीत असताना संताना समाजकंटकांचा त्रास होतो व याच कारणास्तव श्रीसेवकमहाराजांनी चौल सोडले. पत्ता नसताना 'सत्या' तेथे पोचला मी पोचलो तसे अनेक भक्त तेथे पोचत आहेत.

महाराजांचा पत्ता—श्रीकृष्णदास महाराज, मुक्काम श्रीशंकर मंदिर माची खंडाळे, पोष्ट तालुका अलिबाग जि. रायगड.

श्रीसेवकमहाराज शतायु होवोत हीच साईच्छा.

# श्री साईबाबांचा जीवन योग

—डॉ सौ. चारुशीला गुप्ते
कृष्णनिवास, वाळकेश्वर रोड, मुंबई ७

● आपली महाराष्ट्रभूमी रणझुंजार वीरपुरुष, दिव्य प्रतिभेचे साहित्यिक आणि अर्पीत जीवन जगणारे समाजसेवक यांच्या प्रमाणेच 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ' अशा सेवाभावी संतांच्या बाबतीतही भाग्यवान आहे. श्रीज्ञानेश्वरापासून ते रामदास, तुकारामापर्यंत इथे थोर संतांची एक परंपरा निर्माण झाली व ती आजतागायत अखंड राहिली आहे. श्री साईबाबा या दहा दशकांपूर्वीच्या परंपरेतीलच एक संत होऊन गेले.

कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासाचे सांगोपांग दर्शन घेण्यासाठी तेथे होऊन गेलेल्या थोर वीरपुरुषांच्या समाजसेवकांच्या आणि साहित्यिकांच्या चरित्रांचे सूक्ष्म परिशीलन ज्याप्रमाणे मार्गदर्शक ठरते. त्याचप्रमाणे—

जै धर्माची वाट मोडे ।
अधर्माची सीग चढे
तै आम्हा येणे घडे । संसार स्थिती—
सर्वाभूती दया शांती । प्रतिपाळावी वेदोक्ति
हेचि एक निश्चिती करणे आम्हा लागते—

अशा उद्देशाने मानवी जीवनाच्या सर्वांगीण उद्धाराचे कंकण हातात बांधून या पृथ्वीवर वेगवेगळया कालखंडात प्रेषित म्हणून येणाऱ्या संतांच्या अलौकिक जीवनगाथेचे सविस्तर अवलोकन आणि अनुकरणही उपयुक्त ठरते.

कुठल्याही संताच्या व्यक्तित्वाचा विचार करताना ते एक अवतारी पुरुष आहेत असे नेहमी म्हणण्यात येते. त्यांच्या रूपाने शंकर, राम, कृष्ण, हनुमान इत्यादीपैकी एखाद्या देवानेच 'परित्राणाय साधूनाम् ' अवतार घेतला आहे असाच सर्वसाधारण समज असतो. वास्तविक अवतार या शब्दात स्वतंत्र जन्माची कल्पना अभिप्रेत असते. वानगीदाखल यजुर्वेदातील स पर्य गाच्छुक्रम का यम व्रपम स्त्राविर शुद्धमपाप विद्धम् ॥ यजु. ४०।८॥ या ओळीमध्ये ईश्वराला अनंत, बलवान, शुद्ध,

अकाय, अजन्मा, आणि व्रणहीन मानले असून नाडी, शिरा, स्नायु यांच्या बंधना मध्ये न पटणारा अपापविद्ध आहे असे गृहित धरले आहे.

म्हणजेच 'संभवामि युगे युगे' हे तत्वज्ञान आपल्याला मायेमुळे सत्य भासत असते. म्हणून अवतार हे स्वतंत्र जीवन असून 'सत्'चे संरक्षण, 'असत्'चा संहार करून विघडलेल्या धर्माची घडी सुस्थिरपणे बसविण्यात अवतार कार्याचे महत्व असते. त्यामुळे संत हे प्रतिपरमेश्वर नसून त्यांचे प्रेषित आहेत ही कल्पना सुसंगत वाटते. या दृष्टिकोनातून साईबाबांच्या चरित्राचे अवलोकन केले पाहिजे.

श्री सद्गुरूंचे शिर्डी गावामध्ये आगमन कसे झाले. वगैरेसंबंधी अनेक वेळा व अनेक ठिकाणी लिहिले गेले आहे, त्यामुळे त्यांची पुनरुक्ती करण्याची फारशी आवश्यकता नाही. तथापि साईबाबांनी शिर्डीसारख्या एका लहानशा गावची कर्म-योगभूमी म्हणून निवड करून त्या ठिकाणी सामान्यांना नवजीवन देण्याऱ्या कार्याची जी मुहूर्तमेढ रोवली त्याचा विचार अधिक महत्वाचा आहे.

गोदावरी नदीच्या काठी असलेले शिर्डी हे गाव अगदी छोटेखानी असले तरी त्याच्या मागे ऐतिहासिक परंपरा आहे. गोदावरी नदीला गंगामाईचा अवतार मानतात. असा हा पावन परिसर बाबांना जीवनयोगासाठी निवडला यात त्यांचा अंतस्थ हेतू स्पष्ट होतो.

श्री साईबाबा एक साक्षात्कारी संत होते. मानवी जीवनाला शाश्वत मूल्यांचा सनातन आधार असावा. मानवहिताच्या साक्षात्काराने प्रेरित होऊन द्रष्टेपणाने अवघ्या मानवतेला मार्गदर्शन करणारालाच प्रेषित ही पदवी शोभून दिसते. अध्यात्मिक मानवतावादाचा जो पुरस्कार श्री बाबांनी केला त्यावरून ते प्रेषित होते हे मान्य करावे लागते. 'माणसाचे जीवन सामूल्य आहे' असा त्यांना साक्षात्कार झाला होता. म्हणूनच सर्व थरातील माणसांचे जीवन आकर्षक, प्रभावित व संस्कारित करण्याचे कार्य त्यांनी केले अन् दीनदुबळ्या आर्त आणि रंजल्या गांजलेल्यांना दिलासा दिला. साईबाबांच्या व्यक्तित्वामध्ये आत्मोद्धार व लोकोद्धार, दिव्यता नि मानवता यांचा अपूर्व पावन संगम झाला होता. संसारी माणसानी व्यावहारिकदृष्ट्या संसारजीवन सुखी, समृद्ध निर्मळ व निर्लेप कशा रितीने करावे याचा धडा श्रीबाबांनी सर्वसामान्यांना शिकविला.

आजच्या वैज्ञानिक कालखंडामध्येही द्वैताद्वैत, स्पृश्या-स्पृश्य आणि श्रीमंत गरीब हे भेदभाव संपूर्णतया नष्ट झालेले नाहीत. मग पन्नास साठ वर्षापूर्वी ते सर्वत्र

तीव्र स्वरूपात असावेत यात काहीच आश्चर्य नाही. श्रीसाईबाबांच्या अलौकिक तत्वज्ञानासंबंधी विचार केला की समाजाच्या अंगात मुरलेले हे दुर्गुण नष्ट करण्या साठी त्यांनी केलेल्या कार्याचे महत्व लक्षात येते. केवळ गरीब, अज्ञानी व अशिक्षित स्त्री-पुरुषानाच नव्हे तर समाजातील प्रतिष्ठित वर्गातील व्यक्तींनासुद्धा साईबाबांनी समतेचे तत्वज्ञान हसत खेळत शिकविले. ' जे जे भेटी भूत ते मानी भगवंत ' हा त्यांचा तत्वज्ञानाचा गाभा आहे. प्राणीमात्रात एकच आत्मतत्व आहे अशी त्यांनी लोकांना शिकवणूक दिली.

लाठ्या बांध्यावीण विशेषी
कोणी न येई आपुलेपाशी
श्वान सूकर का माशी
हडहड कुणाशी करू नये ॥

हे तत्वज्ञान गोरगरीबांना शिकविताना स्वतः बाबा त्यावर हुकूम आचरण करीत असत. आधी केले मग सांगितले. या न्यायाने ते कुत्रे, डुक्कर, गाईबासरे इत्यादी प्राण्याना अतिशय सहानुभूतीने वागवीत. दीनदुबळयांना, लंगड्या पांगळयांना स्वतःच्या थाळीतले अन्न वाटून टाकीत. त्यांच्या या वागण्यामुळे लोकांनाही त्या प्रमाणे वागण्याची स्फूर्ती येत असे व सर्व विश्वात राम आहे याची त्यांना खात्री पटे. विश्वाची उपेक्षा करून मोक्षप्राप्ती होणार नाही हे बाबांचे सोपे व साधे तत्व-ज्ञान होते अन् ते त्यांनी स्वतःच्या अमोघ व समर्थ वाणीने लोकांन पटवून दिले.

श्रीसाईबाबांनी त्यांच्या कालखंडात आणखी एक अत्यंत महत्वाची कामगिरी केली. धर्मभेद, पंथभेद न मानता सर्वांशी समभावाने वागावे यासाठी त्यांनी रात्रं-दिवस परिश्रम घेतले. सबजा व तुळस ही एकाच आळयामध्ये निकोपपणे वाढू शकतात हे त्यांनी सर्वांच्या लक्षात आणून दिले. ' हिंदू आणि मुसलमान ही दोघेही एकाच ईश्वराची लेकरे आहेत. मशिद अन् मंदिर ही दोन्हीही त्याचीच निवासस्थाने असून रामरहिम ही त्याची दोन रुपे आहेत,' असे ते वारंवार सांगत त्यांच्या या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या त्या काळातील समाजामध्ये पंथ व ' जाती द्वेषाला ' थारा राहिला नाही. वर्णभेद नि वर्गभेद त्यामुळे संपले. स्वभाविकच सर्वांमध्ये समभाव निर्माण झाला. श्री ज्ञानदेवांनी ज्या समतावादाचा पाया घातला, ज्याचा संत तुकाराम कळस झाला त्याच समतावादाची पताका आधुनिक, काळामध्ये साईबाबांनी कायम फडकत ठेवली. एवढेच नव्हे तर ' राष्ट्रीय एकात्मता ' हा शब्द जेव्हा रूढ झाला नव्हता अशा काळात त्यांनी हिंदु व मुसलमानांचे एकीकरण केले अन् सर्व जमाती-मध्ये स्नेहभाव जागृत केला.

बाबांनी विशिष्ट धर्माच्या एकांगीपणाने व अट्टाहासाने पुरस्कार अथवा प्रचार केला नाही. ज्याने त्याने स्वतःच्या धर्मातली सत्तत्वे सांभाळून वागावे अशी त्यांची शिकवण असे. तसेच बाबांनी दुसऱ्यांच्या गुरूंची अथवा देवतांची हेटाळणी केली नाही. शैव आणि वैष्णव पंथाप्रमाणे दैवतावरून वैमनस्य वाढविणे त्यांना नापसंत होते. बाबांच्या या वृत्तीमुळे शिर्डीचा असा एखादा खास पंथ निर्माण झाली नाही. उलट जो तो आपली मूळ श्रद्धास्थाने सांभाळून बाबांच्या कृपेच्या छत्राखाली येऊन एक मोठी संघटना निर्माण झाली.

I am for the poor, for the people Let me speak in the tongue of the people—

असे म्हणून गौतम बुद्धाने लोकजागृतीचे कार्य केले. त्याचप्रमाणे लोकशिक्षणाच्या छोट्या गावात रूजवले व लौकरच त्याचा 'वेलू गेला गगनावरी' प्रमाणे त्यांच्या दिव्य तत्वज्ञानाचा सर्वत्र प्रसार झाला.

साईबाबा म्हणजे एक लोकशाही व स्मर्तुगामी दैवत होऊन गेले. या मर्त्य जगामध्ये त्यांचे वास्तव्य असताना अनेक निष्ठावान भक्तांनाच नव्हे तर नास्तिकांनासुद्धा त्यांच्या अंगी असलेल्या प्रभावी दैवी सामर्थ्याचा प्रत्यय आला. अंगठ्यातून गंगेचे झुळूझुळू वाहणे, अनेकांना त्यांचे आराध्यदैवत बाबांच्या ठिकाणी दिसणे, भयंकर संकटातून मुक्तता होणे असे अनेक चमत्कार अनुभववयास मिळाले.

सामान्यांना जीवनवादाची शिकवण साईबाबांनी दिली आहे ती उरी बाळगून सगळीकडे समभावाने व निरहंकार वृत्तीने जर लोक पाहतील तर या धकाधकीच्या काळामध्ये वैयक्तिक आत्मशांतीबरोबरच सामाजिक विश्वशांतीचाही लाभ झाल्याशिवाय राहणार नाही.

## डॉ. जोशी यांचे वडीलांचे निधन

श्रीसाईनाथ रुग्णालयातील निवासी डॉक्टर श्री. जोशी यांचे वडील श्री. उद्धव रामचंद्र जोशी यांचे शनिवार दिनांक ७ मार्च रोजी पहाटेस शिरडी मुक्कामी देहावसान झाले. ते सोलापूर जिल्ह्यात ठिकठिकाणी हेडमास्तर होते. निधन समयी त्यांचे वय ६५ वर्षाचे होते. त्यांच्यामागे त्यांच्या पत्नी, पुत्र व कन्यका आहेत. श्री. जोशी कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# श्री साईलीला अमृतानुभव

–श्री. रा. ब. वारई
७३।६ काटोल
जि. नागपूर

श्रीसाईवर श्रद्धा ठेवा तो तारून नेईल.
साधना संयमाने सोपी होते.
ईश्वर आहे किंवा नाही हा वाद घालू नका.
लीनतेने विश्वास ठेवून कर्म करा.
लाभाकरिता कुकर्म करू नका.
अखिल मानवजातीचा मार्गदर्शक संत असतो.
मृत्यूनंतर देह नाहीसा होतो; पण आत्मा अमर आहे.
तारणारा श्रीसाई आहे याची खात्री ठेवा !
नुसते नामस्मरण केले तरी पुरे आहे.
भयंकर संकटातून सुद्धा श्रीसाई भक्तांना तारतो.
वदन गोड बोलण्यासाठी आहे टोचून बोलण्यासाठी नाही.

**There are hundreds of books on Sai Baba!**


But our readers unanimously proclaim

## "A MISSION DIVINE!"

has no parallel! It thrills you to the core of your heart. Believe us and buy it immediately. Your hard-earned rupees 45.00 are fully rewarded. pay those and Rs. 4.50 for postage and the book brings you an immense wealth of reading joy.

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**

## श्रीसाईबाबांचे समाधी मंदिर



आलो मी समाधी मंदिरी हे साईनाथ देवा।
दर्शन घेता नेत्र सुखावले कृपा मजवरी ठेवा॥

# श्रीसाईबाबांचे समाधीमंदिर

—सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक 'श्रीसाईलीला'
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

● शिरडीच्या श्रीसाईबाबा संस्थानमध्ये विविध विभाग आहेत व ते सर्व क्तांच्या सुखसोयीसाठीच आहेत. या विभागातून भक्तांची योग्य ती सेवा घडावी शीच इच्छा नेहमी संस्थान शासकांची असते व ती सेवा निरलसपणे व यशस्वी रण्यासाठी प्रत्येक विभागातील अधिकारी आणि त्यांच्या हाताखालील सेवक वर्ग त्रंदिवस सेवाकार्य करींत असतात.

देशाच्या आणि देशा बाहेरच्या कोनाकोपऱ्यातून साईभक्त मंडळी शिरडीला ी येतात, प्रथमच म्हणा, अधूनमधून म्हणा किंवा हरहमेशा म्हणा ती केवळ श्रीसाई ाबांच्या दर्शनासाठी येतात. संत चूडामणी भगवान श्रीसाईनाथांना स्वहस्ते पुष्पमाला क्तीभाव पूर्वक प्रदान करण्यासाठी येतात, श्रीबाबांच्या मनोहर मूर्तीचे नेत्रसौख्य लुटण्यासाठी, घेण्यासाठी येतात. भक्त शिरडीस येऊन बाबांच्या समाधी मंदिरात ोला नाही असे कधीच होत नाही.

आज श्रीसाईबाबांचे समाधी मंदिर म्हणुन जी भव्य वास्तू भक्तांना दिसून येते ती पूर्वी म्हणजे बाबांच्या हयातीत एक दगडी वाडा होता. नागपूरचे लक्षाधिश सावकार व प्रख्यात साईभक्त श्रीमंत गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुट्टी यांचा हा वाडा होय. बापूसाहेबांना येथे श्री मुरलीधराचे मंदिर बांधावयाचे होते. बाबांना विचारूनच त्यांनी वाड्याच्या मंदिररूपी बांधकामाला आरंभ केला होता.

बाबा चावडी वरून लेंडी बागेत जाताना या मंदिरावरून जात असत व जाता येता या मंदिराचे सुरू असलेले बांधकाम पहात असत. मंदिराचे बांधकाम अगदी डोळ्यात भरण्याजोगे झालेले असताना ते एकदा आपले निकटभक्त माधवराव देशपांडे उर्फ शामा यांना म्हणाले होते, "अरे, आपण आता येथेच रहायला येऊ

या, नाचू या, खेळूया बागडू या '' तेव्हा साक्षात् बाबांनाच द्वारकामाई लगतच्या या होणाऱ्या मंदिराचे आकर्षण वाटत होते. या मंदिरात कायमचे वास्तव्य करण्याची इच्छा त्यांनीच अशा प्रकारे प्रगट केली होती.

मिती आश्विन शुद्ध १० मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर १९१८ शके १८४० रोजी विजयादशमीस दुपारी २ वाजून ३५ मिनिटानी बाबांनी आपले अवतार कार्य संपवून आपल्या देहाचा त्याग केला. देहत्यागापूर्वी काही वेळ अगोदर भक्त लक्ष्मीबाई शिंदे यांना नऊ रुपये दक्षिणा भेट म्हणून दिल्यावर बाबा त्यानंतर क्षीण आवाजात म्हणाले होते, ' अरे, मला इथं बरं वाटत नाही, आता मला वाड्यात ( मंदिरात ) घेऊन चला ' हेच बाबांचे अंतीम उद्गार होते. या घटनेपूर्वी काही दिवस अगोदर बाबा प्रत्यक्ष या मंदिरात गेले होते. त्यावेळी आज जिथे समाधी आहे त्याच जागी हाताच्या बोटांनी त्यांनी एक काटकोन चौकोन काढला व ते म्हणाले, ''अरे शाम्या, हीच जागा चांगली आहे. इथेच रहायला यावेसे वाटते हं!'' बाबांच्या देहावसानानंतर शिरडीत हिंदु व मुसलमान यांच्यात त्यांच्या पार्थीव शरीराचे दहन की दफन असा वाद सुरू झाला. ते प्रकरण पुढे मामलेदार कलेक्टरापर्यंत गेले. श्री. साने नावाच्या मामलेदारांनी लोकांचा हा तेथला मतभेद पाहून शेवटी मतदान करावयास लावले. मतदानात बहुसंख्य लोकांनी बुटी वाड्यातच बाबांची समाधी बांधावी असा कौल दिला. शेवटी या ठरावाला मान्यता घेण्यासाठी भक्त काकासाहेब दीक्षित स्वतः अहमदनगरला निघाले. परंतु सद्भाग्याची गोष्ट, ठरावाला विरोध करणाऱ्या मुसलमानांच्या अंतःकरणात परिवर्तन झाले आणि सर्वानुमते बुटी वाड्यातच बाबांची समाधी बांधायचे ठरले गेले. तेथले त्यावेळचे ग्रामपाटील रामचंद्र दादा यांना या निर्णयाने समाधान वाटले.

बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर १९१८ रोजी मोठ्या मिरवणूकीने बाबांचा देह या बुटी वाड्यात आणला गेला व ज्या मंदिरात मुरलीधराची स्थापना व्हायची होती त्या मंदिरातच श्रीबाबांची समाधी बांधली गेली आणि अशा प्रकारे देहत्यागानंतर ३६ तासानी बाबांचा देह कायमचा भक्तांच्या दृष्टी आड झाला आणि तेव्हापासून हे मंदिर ' समाधी मंदिर ' म्हणून जे ओळखण्यात येऊ लागले आहे ते अगदी आजतागायत आणि यापुढेही अगदी कायमचेच होय.

श्रीसाईबाबांची ही समाधी संगमरवरी प्रस्तराच्छादित असून सभोवती सुमारे तीन फूट उंचीचा व सुमारे नऊ फूट लांबी-रुंदीचा चौथरा आहे. समाधीची लांबी ६'२ इंच व रुंदी २'१ इंच असून ती चौथऱ्याच्या काहीशी मध्यावर दक्षिणोत्तर अशी

आहे. समाधीतील बाबांचे मस्तक उत्तरेकडे म्हणजे आरतीच्या वेळी महिला भक्तांना जिथे उभे रहाता येते त्या बाजूस व चरण दक्षिणेकडे म्हणजे पुरुष भक्तमंडळी जिथे उभी रहातात त्या दिशेकडे आहेत. पायथ्याकडे समाधीसमोर कमलदलांवरच्या संगमरवरी पादुका आहेत. बाबांची द्वारकामाईतील फुटलेली वीट समाधीतही बाबांच्या उशाखाली ठेवण्यात आलेली आहे. चौथऱ्यास बाहेरच्या अंगाने तीन पायऱ्या आहेत. चौथरा व त्यावरील तीन बाजूचे कठडे व तीन पायऱ्या चांदीच्या पत्र्याने मढविलेले आहेत. बाबांच्या भक्तमंडळीनीच ही सारी कामे केलेली आहेत.

मंदिरात समाधीच्या मागे लगतच भिंतीला जवळजवळ टेकूनच श्री बाबांची सहा फूट उंचीची नेत्ररम्य मूर्ती सिंहासनावर अधिष्ठीत असून मूर्तीच्या खाली सोड-लेल्या डाव्या पायावर आडवा ठेवलेला उजवा पाय व त्यावर घेतलेला डाव्या हाताचा पंजा आहे. बाबांची ही जगप्रसिद्ध मूर्ती इटालियन कराका मार्बलची बनवि-ण्यात आलेली आहे. इटलीमध्ये कराका या शहरी या संगमरवराच्या खाणीच्या खाणी आहेत. हा कराका मार्बल ' ए ' ग्रेडचा संगमरवर म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. या मूर्तीला तयार करण्यास त्यावेळी २२ हजार रुपये खर्च आला. आज अगदी अशीच मूर्ती तयार करण्यास ७० हजार रु. खर्च येतो पण कराका मार्बल मात्र मिळत नाही. तो परदेशाहून आता आयात पण करता येत नाही.

श्री बाबांच्या या विश्वविख्यात मूर्तीचे शिल्पकार आहेत मुंबापुरीतील गिरगाव विभागातले कै. बाळाजी वसंत उर्फ भाऊसाहेब तालीम. ही मूर्ती तयार करण्यास त्यांना त्यावेळी तब्बल सात महिन्यांचा अवधी लागला. बाबांचा हूबेहूबपणा मूर्तीत आणण्याचा शंभर टक्के यशस्वी यत्न त्यांनी केला आहे. गुरुवार दिनांक ७ आक्टो-बर १९५४ रोजी शिरडीच्या या समाधी मंदिरात ही मूर्ती अहमदाबादचे विख्यात साईभक्त " श्री साई शरणानंद " पूर्वाश्रमीचे श्री. वामनभाई प्राणलालजी पटेल, बी. ए. एल. एल. बी सॉलिसिटर यांचे शुभ हस्ते सन्मानपूर्वक प्रतिष्ठापित करण्यात आली. आज श्री साई शरणानंद यांचे वय ९३ वर्षांचे असून ते सध्या श्री. एम. सी. भट्ट प्रकृतिकुंज हौसिंग सोसायटी, पालडी, अहमदाबाद यांचेकडे रहातात. ता. ७-१०-१९५४ पासून आजतागायत समाधी मंदिरातील श्री बाबांची मूर्ती भक्तांना दर्शन देत आहे.

श्री साईबाबांच्या या शानदार मूर्तीच्या मस्तकावर चांदीची उघडी गोलाकार छत्री लटकत असून पुतळ्याच्या मागे भिंतीवरच चांदीची मोठी चौकटीची प्रभावळ आहे. या प्रभावळीतला मधला भाग कधी चॉकलेटी तर कधी तांबड्या, हिरव्या तर

कधी निळसर रंगाच्या मखमलीने मढविलेला असतो. प्रभावळीच्या डावी-उजवीकडे दोन स्वस्तिक चिन्हे काढलेली आहेत. गोलाकार छत्रीच्यावरच काही अंतरावर आत विद्युत्‌दीप बसविलेली एक काचपेटी असून तीवर 'रघुपति राघव राजाराम। पतित पावन साईनाम।'

हे चरण लिहिलेले आहेत. बाबांच्या मनोहर मूर्तीच्या दोन्ही बाजूस दोन उंच पितळेच्या समया अखंड मंदपणे तेवत असतात. त्या काचघरात ठेवण्यात आल्या आहेत. या समया व काचघराच्या किंचित् थोडेसे वर डाव्या व उजव्या बाजूस पितळेच्या काही फुलदाण्या ठेवण्यात आल्या आहेत. बाबांच्या या मूर्तीकडे पाहिले असता ते आपणाकडे बघतच आहेत असे वाटते.

—

श्रीबाबांचे सिंहासन व पायाखालील गोलाकार आसन चांदीच्या पत्र्याने मढविलेले आहे व हे रौप्यपत्रे काढता-घालता येतात. समाधी मंदिराच्या चौथऱ्याच्या पुढील दोन्ही टोकास दोन मजबूत दक्षिणा पेट्या असून भाविकांनी भेट रक्कम या पेटीतच टाकावयाची असते.

## दैनंदिन कार्यक्रम

श्रीसाईबाबांच्या सुंदर रेखीव मूर्तीने सुशोभित असलेले समाधी मंदिर कर्मचाऱ्यांसाठी दररोज पहाटे पावणे पाच वाजता उघडले जाते व ठीक पाच वाजता भक्तांना श्रींच्या पहिल्या काकड आरतीसाठी प्रवेश दिला जातो. पावणेपाच वाजता मंदिर पुजारी व अन्य कर्मचारी नतमस्तक होऊन मंदिर प्रवेश करतात, व पूजा-सामुग्री, स्नानसामुग्री काढतात. मंदिर उघडल्याबरोबर भक्तांनी समाधी स्थानी अभिषेक करण्यासाठी जी अधिकृत कूपने काढावयाची असतात ती कूपने देण्याचे लगतचे कार्यालयही अगदी याच वेळी ठीक ५ वाजता उघडले जाते. ही कूपने विकत घेण्यासाठी मुख्य रस्त्यावर भक्तांची रांगच लागलेली असते. प्रत्येक तिकीटास आठ आणे या दराने एका भक्तास चार कूपने किंवा तिकीटे मिळू शकतात. गुलाबी रंगाच्या या अभिषेक कूपनावर उजवीकडे काळया शाईत इंग्रजी क्रमांक छापलेला असतो व त्या दिवशीच्या तारखेचा रबरी शिक्का मारलेला असतो. दिनांक १ मार्च १९८१ पासून या अभिषेक कूपनावर खरेदी करणाऱ्या भक्ताचे नावही लिहून देण्यात येते. प्रत्यक्ष अभिषेक करताना भक्ताला आपल्या गोत्राचा, नावाचा उच्चार करावाच लागतो तेव्हा अभिषेक कूपनावर सुद्धा इच्छूक भक्ताचे नाव लिहून दिले तर त्या भक्ताचा अभिषेक श्रीसाईबाबांना पोचला ही भावना लक्षात घेऊन ही नवी व्यवस्था करण्यात आलेली आहे. दरदिवशी ८०० कूपने कापली जातात.

श्रीबाबांचे समाधी मंदिर उघडल्याबरोबर एक दोन मिनिटात भक्तांना काही सूचना दिल्या जातात व एका पाठोपाठ एक अशा तीन टेप ध्वनी मुद्रिका लावल्या जातात.

पहिली मंजुषा १) उठा उठा हो सकळ जन......
दुसरी २) घनश्याम सुंदरा, श्रीधरा......
तिसरी ३) जय जगदिश हरे......

ठीक ५ वाजून १३ मिनिटांनी या मंजुळ ध्वनिमुद्रिकांचा सुप्रभातचा कार्यक्रम संपतो व तो संपताच श्रींच्या काकड आरतीसाठी जमलेल्या भक्तांना ध्वनीक्षेपणावरून पुन्हा काही सूचना दिल्या जातात. त्यापैकी पहिली सूचना आज होणारे अभिषेक हे वैयक्तिक आहेत की सामुदायिक यासंबंधीची असते. भक्तांची गर्दी जर जास्त असेल तर अभिषेक सामुदायिक रित्या करण्याचा निर्णय घेतला जातो. जर भक्तांची गर्दी मर्यादित असेल तर सुरुवातीचे २०० भक्तांचे अभिषेक वैयक्तिक रित्या केले जातात व त्यानंतरचे सर्व गटागटाने सामुदायिक रित्या केले जातात. अभिषेकांचा हा संपूर्ण कार्यक्रम दुपारी १२ ते १२-१५ पर्यंत आटोपता घ्यावाच लागतो कारण श्रीबाबांची दुपारची म्हणजे मध्यान्हीची आरती ठीक १२-१५ ते १२-३० पर्यंत करावयाची असते म्हणून. तेव्हा अभिषेकाच्या कार्यक्रमाची संपूर्ण सूचना, अभिषेकाची कूपने विकत घेण्यासंबंधीची सूचना विशेषतः भक्तांनी अभिषेक तिकीटे स्वतःच रांगेत उभे राहून खरेदी करावीत, दुसऱ्यांची तिकीटे काढू नयेत. फुलवाले-दुकानदार यांचे-कडून स्वतः रांगेत उभे असताना अनधीकृत इसमाकडून तिकीटे खरेदी करू नयेत या सूचना दिल्या जातात. तसेच आरतीसाठी उभे असताना आपापली खिसा पाकिटे सांभाळावीत. गर्दीत महिलांनी दागदागिने, अलंकार घालून येऊ नये आणि मग शेवटी समाधी मंदिरातील आजच्या संपूर्ण कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली जाते व आता आरती सुरू होत आहे आरती चालू असताना समाधीवर फुले उधळू नयेत किंवा समाधीला कुणी स्पर्श करू नये अशा सूचना दिल्या जातात. हा सर्व सूचनांचा कार्यक्रम सकाळी ५-१२ ते ५-१५ या तीन मिनिटात मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषातून सांगितला जातो.

ठीक सकाळी ५-१५ वा. श्रीबाबांची पहिली आरती —काकड आरती सुरू होते. सुरवातीला—

१) जोडूनियां कर चरणीं ठेविला माथा ।
२) उठा पांडुरंगा आता प्रभात समयी पातला ।

३) उठा उठा श्रीसाईनाथा गुरु चरण कमल दावा।

४) उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां। या चार भूपाळ्या म्हटल्या जातात, व श्रीला जागे केले जाते. त्यानंतर काकड आरतीस आरंभ होतो. प्रथम १) "घेऊनियां पंचारती। करू बाबांसी आरती" व त्यानंतर २) काकड आरती करतो साईनाथ देवा ... व ३) भक्तिचिया पोटीं बोध काकडा ज्योती...। या काकड आरत्या म्हटल्या जातात. काकड आरतीनंतर उठा उठा साधुसंत साधा अपुलाले हित...हे पद म्हणण्यात येते. त्यानंतर साईनाथ गुरु माझे आई। हे भजन म्हणून श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय असा जयघोष करण्यात येतो. यानंतर श्री साईनाथ प्रभातष्टक, साई रहम नजर करना, "रहम नजर करो अब मोरे साई", "तुज काय देऊ सावळया मी खाया तरी" व "सद्‌गुरु बाबा साई तुजवांचूनि आश्रय नाहीं भूतली" ही पदे गायिली जातात. शेवटी "अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज योगिराज परब्रह्म श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज" असा दणदणीत ललकार दोन भालदार-चोपदार देवासमोर करून साष्टांग नमस्कार घालतात. बाबांच्या या सर्वच्या सर्व आरत्या श्री. कृ. जा. भीष्म यांनी त्याकाळी रचलेल्या आहेत. १३ पदांच्या काकड आरतीनंतर भक्तांना नवनीताचा प्रसाद वाटण्यात येतो.

काकड आरती ठीक ५-४० ला संपली की लगेच बाबांच्या मंगल स्नानाला आरंभ होतो. बाबांचा हा स्नान सोहळा खरोखरच पहाण्याजोगा असतो. स्नान मूर्तीला तसेच समाधीला पण घातले जाते. समाधी मंदिराच्या उजव्या बाजूस महिला भक्तांना व डाव्या बाजूस पुरुष भक्तांना बसण्याची सोय केली जाते. समाधी समोर मध्यभागी संस्थानचे गवयी, तबला पेटीच्या साथीत मंगलगीते गाऊन बाबांना आळवितात. भालदार-चोपदार आपले रौप्यदंडक घेऊन जवळच उभे असतात. समाधी मंदिरात सर्वत्र लखलखाट असतो. सुरक्षा विभागातील कर्मचारी भक्तांना सर्व विधी नीट पहाता यावेत व दर्शनही करता यावे यासाठी झटत असतात.

श्रीबाबांना स्नान घालण्यापूर्वी प्रथम समाधी व मूर्ती यावर घातलेली वस्त्रे दूर केली जातात. बाबांच्या मागील चौकटी प्रभावळीला लावलेला मुलायम मखमलीचा भाग भिजू नये म्हणून मेणकापडाने आच्छादला जातो. समाधी चौथऱ्याच्या दोन्ही टोकास असलेल्या दक्षिणा पेट्या सुद्धा मेणकापडाने झाकल्या जातात. समाधीला प्रथम थंड पाण्याने स्नान घातले जाते. नंतर श्रीमूर्तीला पंचामृत स्नान घातले जाते. त्यानंतर श्रीमूर्तीला सुगंधी व उष्ण जलाने स्नान घातले जाते. समाधीला

स्नान घालताना ज्यांची इच्छा असेल त्या स्त्री-पुरुष भक्तांना गटागटाने समाधीवर जाऊन समाधीला तांब्याभर पाणी घालता येते. अशा प्रकारे या स्नानविधीसाठी सर्वांना संधी दिली जाते. मात्र अतिशयच गर्दी असेल तर सर्वच स्त्री-पुरुषांना समाधीवर सोडले जात नाही. पुढील सर्व कार्यक्रम वक्तशीरपणे पार पाडण्यासाठी या वरती सोडण्याच्या कार्यक्रमात काटछाट केली जाते, व ती करावीच लागते. आंघोळी-नंतर मूर्ती व समाधी स्वच्छ टॉवेलने साफ कोरडी केली जाते. स्नानविधी चालू असताना भक्तीगीतांच्या ध्वनिमुद्रिका, श्रीविष्णू सहस्त्र नामावलीची सुमधुर पट्टीका, रामरक्षेची पट्टीका इत्यादींच्या ध्वनी पट्टीका ( टेपरेकॉर्डस ) लावल्या जातात. श्रींच्या पंचामृत स्नानाचे जल भक्त तीर्थ म्हणून प्राशन करतात तर काहीजण बाटलीत भरून घेतात. हे तीर्थ जल श्री बाबांच्या मूर्तीच्या पाठीमागील बाजूस प्रदक्षिणा मार्गावर खास बसविलेल्या गोमुखातून घेतले जाते.

स्नानानंतर श्रींच्या मस्तकास केशरी रंगाचा रुमाल बांधला जातो. पोषाख चढविला जातो, कपाळाला अष्टगंध व चंदनगंध आडवे लावले जाते. अंगावर प्रकारपैकी शाल घातली जाते व गळयात छानदार पुष्पहार घातला जातो हा पूजा-विधी झाल्यावर—

शिरडीस ज्याचे लागतील पाय
टळती अपाय सर्व त्याचे—

ही गोड ध्वनीमुद्रिका लावली जाते व त्यानंतर ' शिरडी माझे पंढरपूर साई-बाबा रमावर ' ही आरती म्हटली जाते. यावेळेपर्यंत सकाळचे ठीक सात वाजलेले असतात. श्रीबाबांचा हा स्नान व पूजा सोहळा पूर्ण झालेला असतो. नंतर समस्त भक्तांच्या कल्याणासाठी, शांतीसाठी, देशाच्या, राष्ट्राच्या कल्याणासाठी संस्थानतर्फे बाबांना अगदी पहिला अभिषेक व विधीयुक्त षोडषोपचारे पुजा केली जाते. एव्हां-पर्यंत ठीक साडेसात वाजलेले असतात.

समाधीमंदिरात भक्तांची आता चांगलीच गर्दी झालेली असते. स्त्री-पुरुष मुलं-बाळं नवविवाहित जोडपी स्नानकर्मे आटोपून धूतवस्त्र परिधान करून अभिषेकाची ताटे घेऊन समाधीमंदिरात आलेली असतात. श्रीबाबांच्या या समाधीमंदिराचे तीन भाग आहेत. १) प्रत्यक्ष श्री बाबांच्या सिंहासनाजवळच्या डाव्या-उजव्या दरवाजा-पासून तो थेट जाळीच्या दरवाजापर्यंतचा एक भाग. याची लांबी ४५ फूट व रुंदी २१ फूट इतकी आहे. याला गर्भागार किंवा सभागार असे म्हणतात. या जाळीच्या शिरा-

वरती प्रवेशद्वारापाशीच भक्तगणांची नवसाची नारळाची तोरणे फेडतात. कधी कधी तर ही माळांची रांगच असते. दुसरा भाग जाळीच्या दरवाजापासून तो दीड-दोन फूट उंचीच्या चबुतऱ्यावर बसलेल्या पांढऱ्याशुभ्र स्फटिकाच्या नंदीपर्यंतच्या थेट मुख्य प्रवेशद्वारापर्यंतचा भाग हा ४३ फूट लांब व ३६ फूट रुंद आहे. याला मध्यमंडप किंवा रंगमंडप असे म्हणतात. तिसरा भाग नंदीपासून तो त्यामागील थेट उंच व्यास-पीठापर्यंतचा भाग हा ६० फूट लांब व २८ फूट रुंद आहे. याला सभांगण असे म्हणतात. उत्सव कालातील भजन, कीर्तन, प्रवचन, गायन इ. कार्यक्रम येथेच केले जातात. एकाच वेळी येथे सहाशेवर मंडळी दाटीवाटीने बसू शकतात. मंदिराचा हा भाग १९४९ ते १९५१ या काळात बांधण्यात आला.

ठीक ७–३० वा. जेव्हा भक्तांच्या अभिषेक कार्यक्रमांना सुरुवात होते तेव्हा उजवीकडील जाळीचा दरवाजा व मधला जाळीचा दरवाजा बंद करून घेतला जातो भक्तांनी आणलेल्या अभिषेक कूपनावरील क्रमांक जाळीच्या दरवाजाशी उभे राहून लाल डगलेवाला लाल पगडीधारी चोपदार क्रमांक पुकारतो व त्याप्रमाणे अभिषेका साठी उत्सुक असलेल्या भक्तांना क्रमवार रंगमंडपातून गर्भागारात घेऊन बसविले जाते. अभिषेकासाठी लागणारे पूजासाहित्य श्रीफल, पेढे, लाह्या, चणे-फुटाणे, रेवड्या, हळद, कुंकू, कापूर, उदबत्ती, हार हे अर्थातच मंदिर परिसरातील दुकाना-तून विकत आणावे लागते. या साहित्याचे संस्थानचे असे अधिकृत दुकान नाही. कुणाही भक्तास बाबांना वस्त्र वा वस्तू भेट म्हणून द्यायची असेल तर त्याची लेखा शाखेच्या कार्यालयातून प्रथम नोंद करून पावती आणावी लागते व ती अभिषेक प्रसंगी किंवा दर्शन घेताना पुजाऱ्यांना दाखवावी लागते व मगच वस्त्र समाधीवर ठेवता येते किंवा श्री मूर्तीस पांघरता, लपेटता येते, व वस्तू स्वीकारली जाते.

वैयक्तिक अभिषेकासाठी भक्ताला तीन पायऱ्या चढून समाधीच्या चौथऱ्यावर जावे लागते. तिथे दक्षिणा पेट्यांच्या मागे समाधीच्या काटकोनात मांडून ठेवलेल्या लाकडी पाटावर बसून अभिषेक करावा लागतो. एकाचवेळी सुमारे ७ ते ८ व्यक्ती अभिषेक करू शकतात. संस्थानचे एक भटजी श्रीमूर्तीच्या चरणाजवळ तर दुसरे भटजी समाधीजवळच्या श्रींच्या कमलदलावरच्या पादुकाजवळ बसून अभिषेक विधी सांगतात. अभिषेकाचे सुरुवातीस भक्तांना प्रार्थना करावी लागते, 'हे श्रीसाईनाथ देवा मी स्वतः आणि माझी कुटुंबीय मंडळी आज अभिषेक करीत आहोत. आमच्या सर्व कुटुंबाचे, घरातील द्विपाद व चतुष्पादांचे आरोग्य व ऐश्वर्याचे क्षेमकल्याण करून आमच्यावर आपण सतत कृपादृष्टी ठेवावी अशी मनापासून प्रार्थना करीत आहे व त्याप्रित्यर्थ आपल्या चरणी विधीयुक्त हा अभिषेक करीत आहे तो आपण मान्य

करावा. संस्कृतमधून ही प्रार्थना भटजी सावकाशपणे सांगतात. भक्ताला आपल्या नावाचे इष्ट देवतेचे कुलदेवतेचे, गोत्राचे नामस्मरण करावे लागते. श्रीसाईबाबांच्या १०८ नावाचे स्मरण उच्चार व प्रार्थना या संस्थान भटजींकडून होते प्रत्येक नावा-बरोबर १०८ अक्षता समाधीला भक्ताकडून वाहिल्या जातात. नंतर हळद, कुंकू, अबीर, गुलाल वाहिला जातो, उदबत्ती कापूर लावून निरांजनाने ओवाळले जाते उम्याने छोटीशी आरती केली जाते. भक्त भक्तीभावाने समाधीला नतमस्तक होऊन नमस्कार करतात नंतर भक्ताला श्रीमूर्तीला हार घालून चरणस्पर्श करता येतो. हा झाला वैयक्तिक अभिषेक.

सामुदायिक अभिषेकाचे वेळी रंगमंडपातून जाळीच्या दरवाजाने भक्तांना गटागटाने गर्भागारात घेऊन बसविले जाते. अभिषेकाचे पूजासाहित्याचे ताट आपल्या समोर ठेवून भक्त सामुदायिक अभिषेक कार्याला लागतात. संस्थान पुरोहित चौथऱ्यावर उजवीकडील दक्षिणा पेटीजवळ बसून पूजेच्या सर्व वरील सूचना व्यवस्थितपणे हस्त-ध्वनिक्षेपकावरून सांगतात. शेवटी निरांजन ओवाळून घंटा वाजवून छोटी आरती केली जाते व मग भक्ताला समाधीला व श्रीमूर्तीला वर जाऊन हार स्वहस्ते घालता येतो, व समाधीला नि मूर्तीला स्पर्श वंदन करता येते, अती जवळून दर्शन घेता येते. सामुदायिक अभिषेकाचे वेळी एका तुकडीत गर्भागारात सुमारे ६० ते ७५ भक्त मंडळी व्यवस्थितपणे बसल्या ठिकाणावरून अभिषेक पूजाविधी कार्य व्यवस्थितपणे करू शकतात.

भक्तांचा हा असा वैयक्तिक किंवा सामुदायिक अभिषेकाचा कार्यक्रम दररोज सकाळी ७-३० ते १२ वाजेपर्यंत चालू असतो. सकाळी ७-३० वाजताच समाधी मंदिराचा डावीकडील जाळीचा दरवाजा केवळ दर्शनार्थींसाठी उघडा केला जातो. त्यावेळी फक्त भक्त मंडळींना रांगेने आपल्या बरोबरचे प्रसाद साहित्य घेऊन आत जाता येते व ते समाधी चौथऱ्यावर असलेल्या भटजी- सेवेकऱ्यांद्वारा श्री चरणी अर्पण करता येते. भक्ताने आणलेल्या प्रसादापैकी थोडासा प्रसाद समाधीस्थाना-वरील पुजारी स्टेनलेस स्टीलच्या एका उभट पिंपात काढून ठेवतात व श्रींचा प्रसाद म्हणून उरलेला भक्तांना तीर्थजल देऊन परत देतात. हा पिंपातला गोळा झालेला प्रसाद नंतर भक्तांना आरतीच्या नंतर वाटला जातो. रांगेतून आलेल्या भक्ताला श्रींचे दर्शन घेऊन बाबांच्या सिंहासनालगतच्या दुसऱ्या दरवाजाने बाहेर पडता येते. कुणाही भक्ताला समाधी मंदिरात नारळ फोडता येत नाही. त्यासाठी निराळी व्यवस्था करण्यात आलेली आहे. समाधी मंदिराच्या मागील दरवाजाने बाहेर पडून



श्रीसत्यनारायणाच्या गटागटाने चालू असलेल्या पूजा

वावर आल्याबरोबर लगेच डाव्या हाताला मुद्दाम तयार केलेल्या दगडावर नारळ डवा येतो. एकूण नऊ उभट दगड यासाठी रांगेने लावलेले असून ते फोडताना कांना उन्हाचा त्रास होऊ नये, पायांना चटके बसू नयेत म्हणून सावलीसाठी रचे पत्रे पण त्यावरून येतील असे आच्छादलेले आहेत.

श्रींचा अभिषेक पूजेचा कार्यक्रम चालू असतानाच दर्शन करणाऱ्या भक्तांची पुढे पुढे सरकत असतानाच भक्तांचा श्री सत्यनारायण पूजेचाही कार्यक्रम होतो. समाधी मंदिरात आरतीसाठी पुरुष भक्तमंडळी जिथे उभी रहातात तिथेच असलेल्या खोलीतील दरवाजात शिरून जिन्यावरून माडीवर गेले की तेथील दालनात हा पुजाविधीचा सामुदायिक सोहळा चालू असतो. सकाळी ठीक ९ वता श्रीसत्यनारायणाच्या पुजांना सुरुवात होते, व १२ वाजेतोपर्यंत तो पुजाविधी असतो व शिल्लक भक्तमंडळी असल्यास बाबांच्या दुपारच्या आरतीनंतरही या पुजा केल्या जातात. दर दिवशी एकंदर ९० सत्यनारायण पुजा गटागटाने व्यवस्थितपणे होतात. श्रावण महिन्यात तर १०० पुजांची कमाल मर्यादा ओलां- ली जाते. या पुजेसाठी आवश्यक असलेली तिकीटेही अभिषेक कूपनाच्या खरेदीच्या गीच असलेल्या कार्यालयातूनच प्रत्येकी १० रुपयांना दिली जातात. हळद, कुंकू, बीर, उदबत्ती, सुपारी, तुळशी, सुवासिक फुले इ. पासून तो थेट तुपाच्या शिऱ्याच्या सादापर्यंत आवश्यक ते सर्व साहित्य भक्तांना या प्रसंगी पुरविले जाते. लाकडी टावर बसून समोर चौरंगावरच्या श्रीसत्यनारायणाची पुजा करून भक्त सुखसमाधान वतात असे दिसून आले आहे.

दुपारी ठीक १२-१५ वाजता श्रीसाईबाबांची माध्यान्ह आरती होते. येथपर्यंत बांचे अभिषेक झालेले असतात. आरतीच्या वेळेस सर्व जाळीचे दरवाजे उघडले तात. आरतीचे वेळेस समाधी मंदिराचे तीन भाग साखळदंड व दोरखंड लावून जातात. डावीकडे पुरुष, उजवीकडे महिला व मधल्या भागात भालदार-चोप- र संस्थानचे गायक वादक अशी व्यवस्था करण्यात आलेली असते. आरतीचे आधी श्रीबाबांना महानैवेद्य दाखविला जातो. या महानैवेद्यात वरण, भात, तुपाची ळी, आमटी, दोन भाज्या, पुऱ्या, चटणी, कोशिंबीर, तांदळाची गोड खीर, गोड रा, बेसनाचा लाडू, दही हे भोजन पदार्थ असतात. महानैवेद्याचे ताट श्रीपुढे ठ्या गोलाकार स्टुलावर ठेऊन, त्यावर तुळशीपत्र ठेऊन ग्रहण करण्यास घंटा जवून नमन करून श्रींना आवाहन केले जाते. नंतर संस्थान ब्राम्हण पंचारती पेट- न आरती करतात. ' घेऊनिया पंचारती करू बाबांसी आरती । या अभंगाने आर- स सुरुवात केली जाते. नंतर आरती साईबाबा । सौख्य दातार जीवा ', व त्या

नंतर 'जयदेव जयदेव दत्ता अवधूता, साईं अवधूता' या दोन आरत्या म्हटल्या जातात. नंतर 'शिरडी माझे पंढरपूर साईबाबा रमावर' हा अभंग होतो. नंतर 'घालीन लोटांगण वंदीन चरण' हे नमन होते. पुढे 'हरेराम हरेराम राम राम हरे' चा गजर होतो, लगेच पुजारी आरती समाधी चौथऱ्यावर ठेवतो व समाधी मंदिराच्या दुसऱ्या टोकाकडे थेट नंदीच्या पुढे येऊन श्री मूर्ती समोर लोटांगण घालतो. आरती पुढे चालूच असते. 'ऐसा येई बा साई दिगंबरा' ही प्रार्थना, 'सदा सत्स्वरुप चिदानंद कंद' हे साईनाथ महिम्न स्तोत्रम होते व शेवटी 'ओम यज्ञेन यज्ञमयजंत...' अशी मंत्र पुष्पांजली होते. जवळपास उभ्या असलेल्या भक्तांना पुजारी फुलेपाकळ्या देतात. लगेच 'करचरण कृतंवा...' ही प्रार्थना होते समाधी व मूर्तीवर ही फुले उधळली जातात. नंतर अगदी शेवटी 'अनंत कोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगिराज परब्रम्ह श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज!' असा ललकार भालदार-चोपदार देऊन श्रींपुढे साष्टांग नमस्कार घालतात. आरतीला जमलेली भक्त मंडळी पण जयजयकार करतात व अशा प्रकारे दुपारच्या आरतीचा कार्यक्रम संपतो. श्रीबाबांच्या सिंहासनाकडील एका दरवाजाने पुरुष व दुसऱ्या दरवाजाने महिला नमन-दर्शन करून बाहेर पडल्याबरोबर त्यांना तीर्थ प्रसाद दिला जातो. ही सारी कामे अतिशय शिस्तीत पार पडतात. दुपारची माध्यान्हीची आरती संपल्यावर मात्र कोणत्याही परिस्थितीत कुणालाही समाधी स्थानावर जाऊन श्रींच्या गळ्यात पुष्पहार घालता येत नाही. आरती होण्यापूर्वी मात्र हा विधी कुणालाही करता येतो.

माध्यान्ह आरतीनंतर मात्र समाधीमंदिरात काही वेळ शांतता असते. दर्शन घेणारी भक्त मंडळी येतात, दर्शन घेतात, आणि श्रींना वंदन करून प्रसाद घेऊन जातात. दररोज दुपारी चार ते पाच या काळात समाधीमंदिरात मधल्या भागात साईसच्चरित्र पोथीचे मूकवाचन संस्थान गवई करतात. ते मृगाजिनावर बसून हे वाचन करतात.

दिनमानाप्रमाणे सायंकाळी सूर्यास्ताचे वेळी श्रींची धूपारती होते. धूपारतीच्या आरंभी "घेऊनिया पंचारती। करू बाबांसी आरती" हा अभंग म्हटला जातो. नंतर "आरती साईबाबा ही आरती" व मग "शिरडी माझे पंढरपूर" हा संत दासगणूकृत अभंग, "घालीन लोटांगण वंदिन चरण" हे नमन, "अनंता तुला ते कसे रे स्तवावे" हे नमस्काराष्टक, "ऐसा येई बा साई दिगंबरा.." ही प्रार्थना "सदा सत्स्वरूपं चिदानंदकंद" हे साई महिम्नस्तोत्रम्", "रूसो मम प्रियांबिका मजवरी पिताही रुसो" हे श्री गुरुप्रसाद याचना दशक म्हटले जाऊन मंत्रपुष्पांजली संपताच ती फुले समाधीवर उधळण्यात येतात. प्रत्येकवेळी देवाची आरती संपूर्ण समाधीमंदिरभर फिरविली जाते व भक्तांनी आरतीतील तबकात आपल्या इच्छेनुसार

टाकलेले पैसे हे नंतर समाधीवरील दक्षिणापेटीत टाकले जातात. श्रींवर उधळलेली पण ती फरशीवर पडलेली अशी फुले संस्थान भटची फडक्याने एकवटतात. आरती संपल्याबरोबर जवळच टांगलेल्या छोट्या घंटेचा एक टोला दिला जातो. "करचरण-कृतं वा ही क्षमा" प्रार्थना व श्रींचा ललकार व जयजयकार होऊन आरती संपते व प्रसाद नेहमीप्रमाणेच वाटला जातो. धूपारतीच्या वेळी म्हटली जाणारी "रुसो मम प्रियांबिका, मजवरी पिताही रुसो" ही आरती "श्री बाबांचे बाळ" म्हणजे ठाण्याचे भक्त कै. श्री. बाळकृष्ण विश्वनाथ देव यांनी गुरुवार माघ कृष्ण पक्ष १४ शके १८६१ म्हणजेच ७ मार्च १९४० रोजी रचलेली आहे.

धूपारतीनंतर संस्थानतर्फे श्रीपुढे दररोज रात्री ९ ते १० असा भजनाचा कार्य-क्रम असतो; व तो समाधी मंदिरात नंदीच्या बैठकीच्या पुढे होतो किंवा बाहेरील व्यासपीठावर तरी होतो. पण बाहेरगावची भक्त मंडळी आली असतील व त्यांना जर आपला कार्यक्रम श्रीबाबांच्या पुढे सादर करावयाचा असेल तर तो त्यालाही सादर करता येतो. या कार्यक्रमांना 'दरबारातील हजेरी' असे म्हणतात व सायं-काळी ७-३० नंतर हे कार्यक्रम सादर केले जातात. या प्रसंगी गायक भक्ताला पेटी, तबला, तंबोरा इ. वादनाची जरुर असेल तर साथही दिली जाते; व कार्यक्रम झाल्यावर त्यास प्रसाद रूपाने १ रु. व श्रीफल हजेरी संयोजकांचे हस्ते दिले जाते. या कार्यक्रमाची रितसर नोंद केली जाते व अशी हजेरी लावणाऱ्यांची नावे 'श्रीसाई-लीला' या संस्थानच्या अधिकृत मासिकात दरमहा शिरडीवृत्त या सदरात सन्मान-पूर्वक छापली जातात. ज्या गायक किंवा करमणूकीचे इतर कार्यक्रम करणाऱ्या भक्ताला आपला कार्यक्रम दरबारात व्हावा असे वाटते त्यांना एक छापील आवेदन पत्रकावर आपली माहिती लिहावी लागते हे आवेदन पत्र मंदिर व्यवस्थापकांकडे विनामूल्य मिळते फक्त कार्यक्रम सादर करणाऱ्या भक्ताला आपल्या कार्यक्रमाला किती वेळ लागेल हे त्यात नमूद करावे लागते. बाबांच्या दरबारात आपल्या कार्य-क्रमाची हजेरी लावण्याचा कार्यक्रम ठीक रात्री दहा वाजेतोपर्यंत चालतो.

रात्री दहा वाजता बाबांची चौथी, शेजारती होते, व ती १०-२० वाजेतोपर्यंत चालते. या आरतीस सुरुवात 'ओवाळू आरती माझ्या सद्‌गुरुनाथा, साईनाथा' या आरतीने होते. नंतर 'आरती ज्ञानराजा' ही ज्ञानेश्वरांची व 'आरती तुकारामा' ही संत तुकारामांची आरती म्हटली जाते नंतर 'जयजय साईनाथ आता पहुडावे मंदिरी हो' ही शेजारती म्हटली जाते व त्यानंतर 'आता स्वामी सुखे निद्रा करा अवधूता 'ही अंतीम शेजारती म्हटली जाते. नंतर ' पाहो प्रसादाची वाट...हा अभंग व 'प्रसाद पावला आता विठो निजावे...' हे पद व त्यानंतर 'साईनाथ महाराज

आता कृपा करा गुरुराज ' हा अभंग म्हटला जातो. व नंतर भालदार चोपदार 'ओम राजाधिराज योगिराज परब्रम्ह श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज ' अशी ललकारी देऊन साष्टांग नमस्कार घालतात व आरती संपते.

आरती संपल्यावर मंदिर झाडण्याचा व साफसफाईचा कार्यक्रम सेवक वर्ग सुरू करतात. १०-४५ वाजेपर्यंत हा कार्यक्रम केला जातो आणि मग श्रींना रात्रभर विश्रांती दिली जाते. शेजारतीनंतर समाधीमंदिरातच नव्हे तर मंदिराच्या परिसरातही कोणताच सांस्कृतिक कार्यक्रम केला जात नाही ही विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

रात्री बाबांच्या मूर्तीभोवती पांढरी खास तयार केलेली, शिवलेली मच्छरदाणी लावली जाते. ऋतुमानाप्रमाणे थंडीच्या दिवसात उबदार शाल तर उन्हाळयात पातळसे पांघरूण त्यांच्या शरीरासभोवती लपेटले जाते. कंदील पेटवून समोर ठेवला जातो. चांदीच्या झारीत पाणी भरून त्यावर चांदीचे फुलपात्र ठेवले जाते, व मग समाधीमंदिरातले सर्व दिवे मालवले जातात. पंखे बंद केले जातात आणि समाधी मंदिराची सर्व द्वारे खिडक्या बंद होतात तोपर्यंत रात्रीचे ११ वाजलेले असतात. एकदा मुख्य दरवाजा बंद केल्यावर कोणत्याही परिस्थितीत पुन्हा हा दरवाजा दुसरे दिवशी सकाळी पावणेपाच वाजल्याशिवाय उघडला जात नाही. कर्मचारी सेवेकरी यांचेसाठी मंदिर पावणे पाच वाजता उघडले जाते व भक्तांसाठी ते ठीक पाचाच्या ठोक्याला उघडले जाते.

श्री साईबाबांचे हे समाधी मंदिर मजलीचे असून मजल्यावर काही खोल्या आहेत व त्या उत्सवप्रसंगी जास्त गर्दी जेव्हा होते तेव्हा भक्तांना रहाण्यासाठी दिल्या जातात. समाधी मंदिराच्या मजल्याच्या आतील अंगाला बाबांचे वेळचे काही समकालीन संत व बाबांच्या सहवासातील प्रसिद्ध स्त्री-पुरुषांच्या छायाचित्रांच्या एकाच आकारातील तसबिरी दासगणू महाराज, अण्णासाहेब दाभोलकर, बापूसाहेब बुट्टी, नानासाहेब शिंदे, काकासाहेब दीक्षित, माधवराव देशपांडे, दादासाहेब खापर्डे, लक्ष्मीबाई व बायजाबाई कोते, तात्या कोते पाटील म्हाळसापती भजन इ. च्या सहज ओळखता येतात. समाधी मंदिरात सर्वत्र संगमरवरी लाद्या बसविण्यात आल्या असून बाबांना भेटीदाखल दिलेल्या वस्तू हंडी, झुंबरे, तोरणे, सुंदर सुंदर चित्रांकीत आरसे, दिवे इ. इ. तिथे शोभिवंतपणे लावलेले आहेत. बाबांच्या दिवसभराच्या चारही आरत्यांच्या वेळी समाधीमंदिर भक्तांनी तुडुंब भरले जाते.

श्री साईनाथांच्या समाधी मंदिरात मुख्य दरवाजाने प्रवेश केल्याबरोबर डाव्या [बाजूस] बाहेरून काच लावलेली एक लहानशी खोली आहे. या खोलीत श्री बाबा [वापर]ीत असलेले कपडे, कफन्या, त्यांचे अंगरखे, जोडे (पादुका) चिलीमी, ध्वनी-[क्षेपक]ा, टमरेल, ग्रामोफोन, काठी, सटका, उघडी छत्री, चवरी, अबदागिर, हुक्का, [एक] मोठी पाण्याची पातेली (डेगी) पाण्याची झारी, शामसुंदर या बाबांच्या [लाड]क्या घोड्याचा साज, घोड्याच्या माळा, चांदीचा तोडा इ. वस्तू व्यवस्थित [लावू]न ठेवलेल्या आहेत. या वस्तूंच्या मध्यभागी एका सुशोभित आसनावर [श्री] बाबांची चांदीची तसबीर ठेवण्यात आली आहे. जेव्हा समाधी मंदिरात बाबांची [मूर्त]ी नव्हती तेव्हा हीच तसबिर समाधीवर ठेवली जात असे व मनोभावे भक्त [मंड]ळी तिला वंदन करीत असत. या तसबिरीच्या डाव्या बाजूस मारुती, राम, [लक्ष्]मण, सीता व गोपाळकृष्ण यांच्या मूर्ती आहेत. अंगरखे चर्म पादुका अशा [प्रका]रच्या वस्तू दिर्घकाळ सुव्यवस्थित रहाव्यात म्हणून त्यावर प्लॅस्टिकची आवरणे [घा]लण्यात आलेली असून अधूनमधून जंतूनाशके त्यावर फवारली जातात. ही खोली [ने]हमीच विद्युत दीपानी प्रकाशित केलेली असते त्यामुळे बाहेरून पहाणाऱ्याला या [व]स्तू व्यवस्थित पहाता येतात.

श्री बाबांच्या वरील वस्तूंच्या अगदी समोरच एका काचेच्या कपाटात श्रीसाई-[ब]ाबा संस्थान शिरडीतर्फे आजतागायत प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या एकेक प्रती [व] बाबांची लहान-मोठी रंगीत सर्व आकारातली उपलब्ध अशी छायाचित्रे केवळ [भ]क्तांना पहाण्यासाठी म्हणून ठेवलेली आहेत. संस्थानतर्फे गेली साठ वर्षे श्रीसाई-[ली]ला नावाचे एक मराठी मासिक प्रकाशित होत असते. गेल्या आठवर्षापासून त्याच्या [ज]ोडीला इंग्रजी आवृत्तीही प्रकाशित होत असते. त्या अंकाचीही एक एक ताजी प्रत येथे ठेवलेली असते.

समाधी मंदिराच्या उजवीकडे एक व डाव्या बाजूस दोन खोल्या आहेत. त्यापैकी डावीकडील एका खोलीचा उपयोग दक्षिणापेटीतून जमलेली रक्कम मोजण्यासाठी केला जातो. महिन्यातून तिनदा या रकमा मोजल्या जातात. त्या शेजा-रच्या खोलीत बाबांच्या पूजा साहित्याची दोन कपाटे आहेत. उजवीकडील खोलीत बाबांचे आंघोळीचे साहित्य ठेवलेले असते.

समाधीमंदिरात सिमेंट कॉंक्रीटच्या मुख्य रस्त्यावरून प्रवेश करण्यापूर्वी भक्तांना आपापली पादत्राणे मंदिराच्या पायरीजवळच काढून ठेवावी लागतात. त्यासाठी निराळी व्यवस्थाच करण्यात आली आहे. पादत्राणे योग्य ती काळजी घेणाऱ्या इसमा-

कडे काढून दिली की त्यावर एक क्रमांकाचा बिल्ला ठेवला जातो व त्याच बिल्ल्या दुसरी प्रत भक्ताला दिली जाते. दर्शन घेऊन परत जाताना तो बिल्ला परत क आपली पादत्राणे परत मिळविता येतात. यामुळे पादत्राणे चोरीस जाण्याचा कि हरवण्याचा संभव नसतो. यासाठी पाच पैसे नाममात्र आकार घेतला जातो.

श्री साईबाबांच्या या समाधी मंदिराची व मंदिरात होणाऱ्या सर्व त्या कार्य मांची व उत्सवांची संपूर्ण जबाबदारी श्री. विठ्ठलराव विष्णूपंत बागवे या अधिका त्यांवर सोपविण्यात आलेली आहे. ते मंदिराचे व्यवस्थापक म्हणूनच ओळख जातात. सभांगणात व्यासपीठाचे जवळच त्यांचे निवासस्थान आहे, व सुरक्षा कार्यालयाचे शेजारीच त्यांची कचेरी आहे.

श्री. बागवे यांचा जन्म १५-७-१९२८ रोजी कोकणात मसुरे येथे झाला.



त्यांचे शिक्षण मुंबईस मॅट्रिक पर्यंत झालेले आहे. परळच्या दामोदर हॉलचे मागील बाजूस असलेल्या सोशल सर्व्हिस लीग नाईट हायस्कूलचे ते विद्यार्थी. त्यांचे वडील श्री. विष्णू लाडोजी बागवे हे कोकणात शेती करीत असत. त्यांच्या मातोश्रींचे नाव सरस्वती. त्या १९६४ साली निर्वतल्या. १९४२ साली मॅट्रिक झाल्यावर श्री. बागवे यांनी मिलीटरीत इंजिनियरींग डिपार्टमेंट मध्ये मेकॅनिक म्हणून नोकरी पत्करली तिथे ते १९४७ साल अखेर पर्यंत होते. पुढे १९४७ ते १९५२ पर्यंत त्यांनी मुंबईत पोलीस खात्यात मेकॅनिकल डिपार्टमेंटमध्ये नोकरी पकडली पण त्याही नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी ती नोकरी सोडली व काही खाजगी व्यवसाय त्यांनी सुरू केला. पुढे १ मार्च १९५९ रोजी त्यांनी श्रीसाईबाबा संस्थानमध्ये नोकरीसाठी पदार्पण केले व तेव्हापासुन तो आजता- गायत गेली २१ वर्षे येथेच रमलेले आहेत व आपले कर्तव्य इमाने इतबारे व चोख- पणे बजावत आहेत. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे ते अविवाहीत आहेत. सकाळी ठीक ३-३० वाजता ते उठतात व रात्री ११ नंतर निद्रावश होतात. या काळात त्यांना विश्रांती म्हणून जरा सुद्धा मिळत नाही. समाधी मंदिराचे संपूर्ण व्यवस्थेसाठी त्यांचेकडे एकंदर २८ मंडळींचा नोकरवर्ग देण्यात आलेला आहे. ते असे- २ बत्तीवाले, ४ शिपाई, ७ सेवेकरी, १ स्त्री चोपदार, ६ चोपदार व ७ ब्राम्हण

पुजारी. समाधी मंदिराबरोबरच द्वारकामाईत, चावडी, गुरुस्थान व लेंडी बागेतील दत्त मंदिर या मंदिरांचीही व्यवस्था व तेथील कार्यक्रमांची संपूर्ण जबाबदारी पण श्री. बागवे यांचेवरच आहे. श्री. बागवे यांचेकडे या कामाबरोबरच श्री हेमाडपंत वाचनालयाचेही काम होते पण त्यांचेवरील कामाचा एकंदर ताण पाहून ती जबाबदारी त्यांचेकडील काहीशी सैल केलेली आहे. श्री. बागवे श्रीसाईबाबा संस्थानमध्ये येण्यापूर्वी या समाधी मंदिर विभागाची जबाबदारी अहमदनगरचे श्री मोहिनीराज त्रिंबक खडकतकर यांचेकडे होती. असे आहे हे श्रीसाईबाबांचे समाधी मंदिर, त्याचा इतिहास व तेथील दिवसभराचे संपूर्ण कार्यक्रम आणि तेथील व्यवस्था.

---

**पुढील अंकात-श्री. द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व लेंडीबागेतील श्री दत्तमंदिर यासंबंधीची रंजक माहिती वाचा.**

---

**भक्त वाचकांनो अभिप्राय कळवा.**

प्रिय भक्तवाचकांसाठी खास सुरू करण्यात आलेल्या या नव्या माहितीपूर्ण व संग्राह्य लेखमालेसंबंधी वाचकांनी आपले अभिप्राय संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्यावर अवश्य कळवावेत. ते प्रसिद्ध केले जातील.—संपादक

## भारतातील व परदेशातील श्रीसाईमंदिराची माहिती सूची

श्रीसाईलीला मासिकाने भारतातील तसेच परदेशातील ठिकठिकाणी असलेल्या श्रीसाईबाबा मंदिराची एक माहिती-वजा सूची तयार करण्याचे निश्चित ठरविले आहे. तरी ठिकठिकाणी असलेल्या मंदिर व्यवस्थापकांनी, विश्वस्त मंडळीनी आपापल्या श्री देवस्थानाची पुढीलप्रमाणे माहिती व शक्य झाल्यास श्रीमूर्तींचे छायाचित्र त्वरेने पाठवून देण्याचे करावे ही विनंती.

१) श्री मंदिराचे स्थान

२) मंदिर स्थापन केल्याची तारीख

३) श्रीमंदिराचे मूर्तीचे थोडक्यात वर्णन

४) व्यवस्थापक मंडळ अथवा
विश्वस्त मंडळाची नावे

माहिती पाठविण्याचा पत्ता—संपादक श्रीसाईलीला, ८०४ बी साई निकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४

# नटनाटकी खेळिया श्री साईनाथ

—श्री. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव पेठ पुणे ३०

● साईसच्चरितकार सत्कवी अण्णासाहेब दाभोळकर यांनी श्रीसाईसच्चरितात श्रीसाईनाथांना अनेक विशेषणे लावून गौरविले आहे. त्या सर्व विशेषणात 'नट नाटकी' हे विशेषण मिश्किल भाव व्यक्त करणारे आहे. त्याचा अर्थ असा की या प्रेमळ, भक्तवत्सल, भक्ताभिमानी साईनाथाच्या अंगी (श्रीकृष्णाप्रमाणे) खोड्या-सुद्धा काही कमी भरलेल्या नाहीत! एखाद्या कुशल नटाप्रमाणे हा साईनाथ केव्हा काय नाटक रचील आणि एखाद्याला हातोहात कसा बनवील याचा काही नेम नाही!

अण्णासाहेब दाभोलकरांचे निदान काही खोटे नाही. अनुभवजन्य सत्यावरच ते आधारलेले आहे. याचा प्रत्यय श्रीसाईसच्चरितातील लीलांची मीमांसा करीत असताना आल्याशिवाय राहात नाही. श्रीसाईनाथ केवळ नटच नव्हेत; नाटक रच-णारे केवळ नाटककारच नव्हेत; तर त्या त्या छोट्या नाटकाचे किंवा लीलारूपी नाट्यकल्यांचे सूत्रधारही तेच होत!

साईचरित्र ही अशा अनेक चटकदार नाट्यकल्यांची एक सलग सुंदर माला असून भक्तवत्सलतेच्या सूत्रात ती हळुवारपणे ओवली आहे. सिद्दिकी फाळके यांचा मशीद-प्रवेश; देव मामलेदाराचे चिंधी-प्रकरण; अमीर शक्कर यांचा तुरुंगवासाप्रमाणे असलेला चावडीवास; रामजन्मोत्सवाच्या सुरुवातीचे रामायण; ठक्करसी जेठाभाई यांचे पंचनामा-प्रकरण; इंग्रज अधिकाऱ्याची कोपरगाव इस्पितळात केलेली डांबणूक अशी अनेक नाट्यकली भिन्न भिन्न प्रवेशाप्रमाणे या तीन अंकी नाटकात मोठ्या कुशलतेने ती गुंफली आहेत.

शिरडीत प्रवेश, शिरडीतील साठ वर्षांचे प्रदीर्घ वास्तव्य आणि देहत्याग हे श्रीसाईचरित्राचे तीन कालखंड नाटकाचा प्रारंभ, मध्य आणि शेवट याप्रमाणे असून हे नाटक शेवटपर्यंत रंगलेले आहे. त्यातही विनोदी नट शेवटच्या क्षणीही सर्वांना आपल्या कलेचा नमुना दाखवून जातो त्याप्रमाणे अखेरच्या क्षणीही श्रीसाईनाथांनी निर्वाणीचाही एक प्रवेश रचला आहे! त्यात श्रीसाईनाथ कण्हत आहेत; वझे नावाचा

एक ब्राह्मण त्यांच्या पुढ्यात बसून रामविजयाची पोथी रात्रंदिवस अखंडपणे वाचत आहे; आणि तिकडे घरी लाडका भाचा तात्याबा मरणोन्मुख होऊन अखेरच्या घटका मोजीत आहे.

हे प्रत्येक नाटुकले दिसायला साधे असले तरी सर्वांच्या ध्यानी राहील असे ते एक रामायण आहे. त्यातील प्रमुख रस रौद्र असला तरी त्याची परिणती शेवटी भक्तिरसात आहे. थोडक्यात म्हणजे या नाटुकल्याच्या रूपाने कालांतराने भक्तास आनंद आणि बोध यांचा लाभ दुग्धशर्करायोगाप्रमाणे व्हावा हाच श्रीसाईनाथांचा हे नाटक रचण्यामागील मूळ हेतू आहे.

या नटनाटकी साईनाथांचे पोट एक दिवस दुखू लागते. त्याचीवर इलाज म्हणून सोनामुखीच्या पाल्याची साईनाथास आठवण होते. तो पाला बाजारपेठेत जाऊन कोण आणील बरे ! अशा वेळी स्नानसंध्यादी आन्हिक लवकर उरकून, पोथ्यांचे एक भले मोठे बाड समोर ठेवून, त्यावर पोथी ठेवून वाचणारा कर्मठ भक्त रामदास श्रीसाईनाथांना समोरच्च दिसतो. येथूनच या नाट्याची सुरुवात होते.

गुर्वाज्ञापालन म्हणून रामदास आपल्या पोथ्या तेथेच टाकून पेठेकडे धावतो आणि काही क्षणातच सोनामुखी घेऊन श्रीसाईनाथांसमोर हजर होतो. त्यावेळी त्याच्या ध्यानी येते की आपल्या पोथ्यांच्या बाडातील पोथ्यांची हुसकाहुसकी आपल्या गैर-हजेरीत कोणीतरी केली आहे आणि विष्णुसहस्रनामाची त्यातील पोथी कोणीतरी हातोहात तेथून पळविली आहे !

त्यावेळी मशिदीत व्यक्ती दोनच होत्या. एक स्वतः श्रीसाईनाथ आणि दुसरे शामराव ! साहजिकच या दोन व्यक्तींखेरीज तिसरी कोण व्यक्ती येथे येऊन आपली पोथी पळविणार ? या कारणामुळेच संशयी रामदासास शामरावांचा संशय येऊ लागला ! अशा वेळी 'कळीचे नारद' अण्णा बाबरे पुढे झाले आणि विष्णुसहस्र-नामाची तुझी पोथी या शामरावांकडेच असल्याची खात्रीशीर बातमी त्यांनी तापट, कर्मठ, भडक डोक्याच्या संशयी रामदासाला दिली !

झाले ! एवढ्या बातम्यानिशी रामदास शामरावांच्या हाताशी झोंबू लागला. दमदाटी करून दोन हात करण्याचे आव्हान करू लागला. अशा वेळी चतुर शाम-रावांनी थोडे पडते घेऊन पंचरत्नगीता विष्णुसहस्रनामाच्या मोबदल्यात त्याला देऊ केली. तरीही चोरीचा, खोटेपणाचा शामरावावरील आळ रामदास थोडासुद्धा मागे घेईना. तेव्हा श्रीसाईनाथ पुढे झाले. शामरावाची बाजू श्रीसाईनाथांनी घेतली.

श्रीसाईनाथ म्हणाले: रामदास ! समज, त्याने घेतली तुझी पोथी, तर कांगावा करण्यासारखे एवढे त्यात काय आहे ! हा शामा झाला, तरी आपलाच ना ! का

कुणी बाहेरचा, अनोळखी, परका आहे ? नाही ना ? मग कशाला एवढा शिरा ताणून भांडतोस ! आणि जगाला तमाशा तरी कशाला दाखवितोस !

अरे, एवढा पोथ्यापुराणे येथे माझ्यासमोर बसून वाचतोस, पण तुझ्या वृत्तीत बदल होण्याच्या नावाने शून्य ! मग वाचतोस तरी कशाला ते अध्यात्मरामायण, आणि ते विष्णुसहस्रनाम ! आणि वर त्या भाराभर पोथ्या ! पुन्हा वर, स्वतःला म्हणवितोस कोण ? तर रामदास ! रामाचा दास !

अरे ! त्या शाम्याचे नाव बाबा ! कशाला घेतोस ? मीच उचलली बरे तुझी पोथी ! मीच दिली बरे त्या शाम्याला ती ! जा ! घेऊन जा ती तुझी तुला ! तुला बाबा ! माणसापरीस पोथी जास्त ! होय की नाही ?

मी मनात म्हटले, त्याला ती पोथी मुखोद्गत आहे. आता शाम्यालाच ती होईल ! शाम्या ती वाचील ! रोज तिची आवर्तने करील ! पण कशाचे काय, आणि कशाचे काय ! इकडे पोथीसाठी तुझा जीव अगदी चालला ! ती कधी एकदा जवळ बाळगीन असे तुला झाले !

या सर्व नाट्याचा अर्थ इतकाच की ज्या वस्तूची गरज ज्या व्यक्तीला असेल तिलाच ती मिळावी. विष्णुसहस्रनामाची खरी गरज शामरावांना होती. रामदासाला तिची गरज नव्हती. कारण असे की विष्णुसहस्रनाम रामदासाला मुखोद्गत होते. मग पुन्हा पोथी त्याने जवळ बाळगण्याचे कारण काय ? पोथ्यांच्या बाडाचा सोस म्हणून ? ते बाड जाता येता लोकाना दिसावे म्हणून ? लोकांनी आपणास अनुष्ठान करणारा भक्त म्हणावे म्हणून ?

कर्मठ वृत्तीने पोथ्यांची अनुष्ठाने करूनही रामदासाच्या वृत्तीत काहीच बदल झाला नाही, हे एक उघड सत्य आहे. वृत्तीत बदल झाला असता तर त्याचे मन निर्मळ झाले असते. संशयीपणा, भांडखोरपणा, हावरटपणा यांचा लवलेशही त्याच्या वृत्तीत उरला नसता. सर्व भक्तांकडे स्नेहाच्या दृष्टीने त्याने पाहिले असते. पो थीतील आशयामुळे भारावल्यामुळे ती पोथीच त्याने आपणहून शामरावाना देऊन त्याना आपल्या आनंदात सहभागी केले असते. परंतु पोथीतील आशयापेक्षा पोथीची प्रतच रामदासास प्रिय झाली ! चित्तशुद्धीचे साधन बाजूस पडून त्याच्या चित्तामधील विशेषच येथे बलवत्तर झाला ! पोसला गेला !

प्रापंचिक तर राहोतच, परंतु रामदासासारख्या परमार्थ मार्गातील रोग्याच्या रोगाचे निदान अशा नाटयामुळे अचूक करून त्याला लागू पडेल अशी मात्रा हसत खेळत देणाऱ्या या 'नटनाटकी' साईनाथांचे वर्णन सच्चरितकारांनीही तितक्याच मार्मिकपणे केले आहे. सच्चरितकार म्हणतात—

ऐसा हा साईनाथ प्रेमळ । खेळिया परमार्थाचा दुर्मिळ ।
दावील केव्हा कैसी कळ । करणी अकळ तयाची ॥

## शिरडीतील श्रीरामनवमी उत्सव

सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीरामनवमी महोत्सव शनिवार दिनांक ११–४–१९८१ ते सोमवार दिनांक १३–४–८१ पर्यंत नेहमीप्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती श्री. क. हि. काकरे कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी हे करतात. उत्सवात नेहमीप्रमाणे श्री. अनंतराव आठवले यांची किर्तन प्रवचने होणार असून अनेक गायक–भक्त मंडळी आपापली हजेरी लावणार आहेत.

## मुंबईतील श्रीरामनवमी

संस्थानच्या 'साईनिकेतन' डॉ. आंबेडकर मार्ग दादर येथल्या कार्यालयातही रविवार दि. १२–४–८१ रोजी रामनवमी उत्सव साजरा केला जाईल व दुपारी १२ वा. आरती व प्रसादाचा कार्यक्रम होईल. तत्पूर्वी गायन, भजन, प्रवचन इ. कार्यक्रम होतीलच.

# मंत्रपुष्पांजली व ध्यान श्लोक

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१/१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंड गार्डन रोड, पुणे ४११००१

## मंत्रपुष्पांजली

● शिरडी येथे आरतीला व सर्वच ठिकाणी देवपूजेच्या शेवटी मंत्रपुष्पांजली म्हणून देवाला फुल वाहिले जाते. याचे ४ मंत्र किंवा श्लोक आहेत. ते अनुवादा सहित लेखाच्या शेवटी दिले आहेत.

पहिला मंत्र ऋग्वेदातील पुरुषसूक्ताचा शेवटचा म्हणजे १६ वा मंत्र आहे. देवानी त्या काळी मुख्य धर्म असलेल्या यज्ञाने यज्ञनारायणाचे पूजन करून स्वर्गाची प्राप्ती केली याचे वर्णन आहे. षोडशोपचाराने (सोळा उपचारांनी) देवपूजा करताना प्रत्येक उपचाराच्या वेळी पुरुषसूक्ताचा एक मंत्र म्हणण्याची प्रथा आहे. मंत्र-पुष्प अर्पण करण्याचा विधि पूजेच्या शेवटी म्हणजे १६ वा येतो म्हणून पुरुषसूक्ताचा हा १६ वा मंत्र येथे आलेला आहे.

दुसरा मंत्र वैश्रवणाला म्हणजे कुबेराला धनाचे देवतेला उद्देशून म्हटला आहे. त्याला नमस्कार करून त्याने आमच्या सर्व इच्छा पूर्ण कराव्या अशी त्याला प्रार्थना केली आहे.

तिसऱ्या मंत्रात सर्वांचे कल्याण इच्छिले आहे. आपल्या राजाला दीर्घायुष्य लाभून त्याला या लोकात व परलोकात सर्व काही मिळावे व या पृथ्वीवर एकच राज्य असावे अशी प्रार्थना केली आहे. आपला राजा सुखी असला म्हणजे प्रजाही सुखी होईल अशी भावना दिसते. तसेच सर्वत्र एकच राज्य असले म्हणजे युद्ध होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही व सर्वत्र शांती नांदते असा आशय प्रार्थने मागे असावा.

चौथ्या श्लोकात एक प्रचलीत म्हण नमूद केलेली आहे. मरुत्त नावाचा सम्राट सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारा म्हणजे दानशूर होता म्हणून त्याचे घरी मरुत देवता वाढपी होऊन व विश्वे देवता सभासद होऊन राहिले. याचा आशय धन मिळाले तरी त्याचा उपयोग फक्त चैनीसाठी न करता गरीबाना दान करण्यात केला तर देवताही त्याचे घरी पाणी भरतात इतकी त्याची थोरवी वाढते असा असावा.

## ध्यान श्लोक

हा श्लोक शिरडी संस्थानने प्रकाशित केलेल्या 'श्री साईनाथ सगुणोपासना' या पुस्तिकेच्या १ ल्या पानावर आहे. अर्थ फारच सुंदर आहे. तो श्लोकही अनुवादासह लेखाच्या शेवटी दिला आहे.

। मंत्रपुष्पांजलिः ।

( साईनाथ–सगुणोपासना पान १६ )

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥ १ ॥
( ऋ० १०-९०-१६ )

देवानी यज्ञद्वारे यज्ञनारायणाचे ( श्री विष्णुचे ) पूजन केले. पूजनाची ही विधी हाच पूर्वी मुख्य धर्म होता. अशाने ते देव मोठ्या पदाला पावून जेथे सिद्धि पावलेल्या देवता ( साध्या ) आधीच होत्या त्या स्वर्गाला गेले.

ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् कामकामाय मह्यम् । कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ॥२॥ ( तै० अ. १-१-६ )

राजांच्या पण राजाला, ( शत्रुला ) बळाने दबविणाऱ्या, अत्यंत कीर्तिमान् अशा कुबेराला आम्ही नमस्कार करतो. सर्व कामनांचा ( इच्छांचा ) स्वामी कुबेर कामना करणाऱ्या आम्हाला आमच्या त्या त्या इच्छा पूर्ण करो महान् कीर्तिमान् महाराज कुबेर यांना आमचा नमस्कार असो.

ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं
माहाराज्यमाधिपत्यमयं समन्तपर्यायी स्यात् सार्वभौमः
सार्वायुष आन्तादापरार्धात् ।
पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति ॥ ( ऐ० ब्रा. ८-२५ )

कल्याण असो. ह्या पूर्ण आयुष्यवंत आणि सर्व पृथ्वीच्या स्वामीला साम्राज्य, भोग्य संपत्ति, स्वाराज्य, प्रकाश, परमपद, राज्य, महाराज्य आणि पूर्णपणे सर्वांवर अधिपत्य प्राप्त होवो. समुद्राने वेढलेल्या पृथ्वीवर एका टोकापासून दुसऱ्या टोकांपर्यंत एकच राजा असो.

तदप्येष. श्लोकोऽभिगीतो 'मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद' इति ॥

या विषयी एक श्लोक म्हटला जातो–सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारा अविक्षिताचा मुलगा सम्राट मरुत्त याच्या घरी मरुत देवता अन्न वाढणारे होऊन व विश्वे देवता सभासद बनून राहिले होते.

।ध्यानम्।

(साईनाथ–सगुणोपासना पान १)

(स्रग्धरा)

(यद्–उदक्–पार्श्वतो) (उदक्=उत्तर दिशा)

गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुकपार्श्वतो योज नैकं
प्रादुर्भूत्वाऽऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्र धाम्नि।
सर्वैर्ज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन् साईनाथः ॥१॥

(प्रादुर्भूत्वा–आत्मभूत्या–अनिश–जनित–महे)
(विविध–जनपदात्–आगतैः) (पूर्णब्रह्म–एव)

गोदावरी नदीचा प्रवाह वाहतो त्याच्या उत्तरेकडे एक योजन (८–९ मैल) जेथे सतत प्रार्थना केल्या जातात अशा शिरडी क्षेत्राच्या ठिकाणी स्वतःच्या प्रभावाने उत्पन्न होऊन, निरनिराळ्या देशातून आलेल्या सर्व जातींच्या समूहांकडून स्तुती केले जाऊन, साक्षात् पूर्ण ब्रह्मच असे श्रीसाईनाथ सर्व जगाला पावन करीत विजयी होत आहेत.

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥

श्रीसाईलीलेला ६० वर्षे पूर्ण झाली याबद्दल आमचे हार्दीक अभिनंदन !

## सेवा इंडस्ट्रीज

आमच्याकडे सर्व प्रकारच्या उत्तम डाईज, आणि शिटमेटलचे सुटे पार्ट, व वेगवेगळे ॲशट्रे तयार केले जातात.

संपर्कासाठी :– १०१ डायमन्ड इंडस्ट्रीअल इस्टेट, गोरेगाव (पूर्व)
मुंबई नं. ४०००६३

मालक : श्री. एकनाथ एम् मेस्त्री

दूरध्वनी द्वारा ६९ १० ५५

# नेत्रशिबीर नव्हे नेत्रयज्ञच!

1248

कु. रेखा दिघे

श्रीसाईबाबांचे नाव कोणाला ठाऊक नाही अशी व्यक्ती या भारतदेशात तरी क्वचितच आढळेल. कित्येकांचे आराध्य दैवत असलेले श्रीसाईबाबा, भक्तांच्या हाकेला धावूनच जातात अशी भक्तांची निस्सिम भक्ती आहे. अशी ही व्यक्ती होती तरी कोण हा अजूनही वादग्रस्त प्रश्न लोकांच्या मनाला भेडसावत असतो. परंतु ही व्यक्ती कोण, कोठली किंवा कोणत्या जातीची हा विचार न करता फक्त एकच उत्तर मिळते ते म्हणजे ही एक अत्यंत थोर विभूती होती. साईबाबा जेव्हा शिर्डीत आले तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या त्रासातून जावे लागले. लोकांनी त्यांना फार छळले. परंतु दैवी शक्तीपुढे कोणाचे चालते? त्यांनी त्यांना त्रास दिला त्याना या ना त्या तऱ्हेने या सर्व गोष्टींना तोंड द्यावेच लागले. कोणाला जास्त प्रमाणात तर कोणाला कमी. परंतु यालाही बाबांनी दुजोरा असाच दिला की अरे त्याने तुझे वाईट केले, तर त्याचा मोबदला म्हणून तू त्याचे कधीही वाईट करू नकोस, वाईट चिंतू नकोस. मनुष्य देह हा एकदाच प्राप्त होतो त्याचा नीट उपभोग घेण्याचे सोडून नुसतेच वादविवाद करत बसले म्हणजे देव भेटत नाही. त्यासाठी स्वतः जवळचा अभिमान विसरायला लागतो. जो काम, क्रोध, मत्सर या सर्वांवर मात करतो तोच देवापर्यंत पोहोचतो. हरी हरी करून देव भेटत नाही, तर याकरिता रंजल्यागांजल्या, दीन-दुबळ्या व दुःखपीडीतांची सेवा करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. यातूनच परमात्म्याचे खरे दर्शन घडते. जो या सर्वांना आपले मानून त्यांची सेवा आनंदी वृत्तीने करतो तोच परमात्म्याच्या समीप जातो. अपकार करणाऱ्यांनाही उपकारच करावा ही बाबांची शिकवण. सहज सोप्या गोष्टींतून अत्यंत मौल्यवान उपदेश बाबा सहजपणे करीत असत.

फाटके तुटके नेसतो रे। मन मानेल तेथे बसतो रे। वेड्या वेड्यापरी दिसतो रे। परी ब्रह्मांड गिळून असतो रे। अशी स्थिती असलेल्या या अवलियाने अनेक दीनदुःखितांची, दीनदुबळ्यांची सेवा करण्यात आपला बराचसा काळ घालवला. वेळप्रसंगी ते स्वतः लोकांना औषधपाणी देत असत, त्यांची सेवाशुश्रुषा करीत असत. ध्येय एकच, त्यांच्यातच खरीखुरी परमेश्वराची सेवा आहे.

हे साईबाबांचे व्रत, हा साईबाबांचा वारसा, आजही या शिर्डी गावात चालत आला आहे. श्रीसाईबाबा संस्थानतर्फे एक हॉस्पीटल चालवले जाते. यात अनेक

ठिकाणाहून लोक येतात, व बरे होऊन जातात. मोठमोठे डॉक्टर्स येऊन रुग्णांची सेवा करण्याचा लाभ घेतात. याठिकाणी; बाबांच्या रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा याचा खराखुरा प्रत्यय येतो तो येथे गेले तिन वर्षे सतत भरणाऱ्या नेत्रशिबिरामुळे श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तसेच मुंबई, कफ परेड व कोपरगाव येथील लायन्स क्लबच्या सौजन्याने प्रस्थापित होणाऱ्या या शिबिराचा लाभ गावोगावाहून येऊन अनेक लोक घेतात. मुंबईतील प्रख्यात डॉक्टर्स आपला अमूल्य वेळ खर्च करून या कामासाठी शिर्डीस येतात. इथे ८ दिवस याच रुग्णांच्या सेवेत देहभान विसरून स्वतःला हरवून बसतात. असेच गेले तीन वर्ष चालणारे शिबिर यंदाही फार मोठ्या उत्साहाने भरले होते. यात शिर्डी गावातील नव्हे, केवळ नगर जिल्ह्यातीलच नव्हे तर सर्व महाराष्ट्रातून दूर दूरचे लोक आले होते. नेत्रशिबिर यंदाचे वर्षी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तसेच लायन्स क्लब कफ परेड, मुंबई, कोपरगाव व रॉयल कॉमन वेल्थ सोसायटी ऑफ इंडिया यांचे सौजन्याने भरविण्यात आले होते.

ह्या नेत्र शिबीरा करिता तयारीच्या कामाची सुरुवात शिबीराच्या तारखेच्या सुमारे १ महिना अगोदरच झाली. सर्व प्राथमीक तयारीची जबाबदारी श्रीसाईबाबा संस्थानच्या हॉस्पीटलचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. देशपांडे यांनी आपले शिरावर घेतली होती व ती त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली. लिखाण काम व इतर कामे करून घेण्या करीता एका लेखनीकाची तात्पुर्ती नेमणूक करण्या पासून ते जाहिराती पत्रके छापून घेणे, ती गावोगावी आणि आठवडे बाजारात वाटण्याची व शिबीराच्या प्रचाराची व्यवस्था करणे, नेत्र शिबीराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या ४५० रुग्णांची नोंदणी करणे व त्यांची प्राथमीक वैद्यकीय तपासणी करून ठेवणे पर्यंतची र्व कामे त्यांनी चोखपणे मन लावून केली.

यास सुरवात झाली ती दि. २०-२-१९८१ रोजी.- दिनांक २०-२-८१ व २१-२-८१ रोजी प्रथम डॉ. शिवलकर, डॉ. बिजूर आर. एम. ओ. बच्यूअली हॉस्पीटल यांनी एकूण ४५० रुग्णांची तपासणी केली नंतर त्यातील फक्त २४२ रुग्णांना दाखल करून घेतले. बाकिच्या रुग्णांना किरकोळ उपचार करून घरी जाण्यास परवानगी दिली. नंतर दिनांक २२-२ व २३-२ रोजी महत्वाचे कार्यक्रमास आरंभ केला व तो डॉ. सरदेसाई, डॉ. तेलंग, डॉ. शिवलकर, डॉ. बारस्कर, डॉ. बिजूर इ. प्रख्यात नामवंत शल्यविशारदांनी. नेत्रशिबीर हा शब्द या एवढ्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या कार्यक्रमास फारच किरकोळ वाटतो. हे नेत्रशिबीर नसून नेत्रयज्ञच होता. यात आहूती दिली ती वर नमूद केलेल्या नेत्रशल्यविशारदांनी. या दोन दिवसात त्यांनी एकूण २४२ ऑपरेशन्स केली. प्रथम डॉक्टर बारस्कर यांनी इंजक्शन देऊन

ज्या डोळ्यांचे ऑपरेशन करावयाचे आहे तो भाग बधिर करण्याचे महत्वाचे कार्य करावे नंतर, तत्परतेने होमगार्डसनी रुग्णास ऑपरेशन टेबलावर न्यावे, व ऑपरेशनासाठी तयारिनीशी सज्ज असलेल्या डॉक्टर्सनी आपली साधने चालवून मदतनिसांचे मदतीने आलेल्या रुग्णाचे मोतीबिंदूचे ऑपरेशन करावे व नंतर फोल्डींग स्ट्रेचरवरून सदर रुग्णास एक दृष्टीसारखी अमूल्य गोष्ट भेट देऊन, पुन्हा होमगार्डसचे सहाय्याने त्याचे बिछान्यावर नेऊन झोपवावे. हे कार्य फक्त ४–५ मिनिटांचे. परंतु त्यातील आनंद काही विरळाच. बाबांचे रुग्णसेवा हे ध्येय डोळ्यापुढे ठेवून, कोणताही लाभाची अपेक्षा न बाळगता अत्यंत गतीने व तितक्याच तन्मयतेने हे काम सर्वजण पार पाडत होते. यात कोणताही दुजाभाव नव्हता, कोणताही स्वार्थ नव्हता. प्रत्येकजण हे आपले आद्य कर्तव्य समजुन काम करीत होता. यात होती फक्त आपुलकी व काहीतरी करण्याची जिज्ञासा. काहीतरी जगावेगळे मिळविण्याची आस. यात होता निव्वळ परमार्थ. दिनांक २४–२–८१ हा दिवस होता संपूर्ण विश्रांतीचा.

दिनांक २५।२ ते २७।२ पर्यंत झालेल्या जखमेचे ड्रेसींग व रुग्णांची विचारपूस करण्यात गेले. दिनांक १।३।८१ हा रुग्णांच्या आयुष्यातील एक विलक्षण आनंदाचा, अलौकिक भाग्याचा, व चिरकाल लक्षात राहणारा असा क्षण. त्या दिवशी त्यांच्या डोळ्याच्या पट्टया काढण्यात आल्या. त्यामुळेच त्याना पुनः प्राप्त झालेल्या दृष्टीचा आनंद अवर्णनीयच होता. त्यांच्यापेक्षा जास्त समाधान झळकत होते ते ज्यांनी त्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले त्यांच्या चेहऱ्यावर. आपण लावलेल्या वृक्षाला भरघोस पीक आल्याचे समाधान होते त्यांच्या मनातः कोठेतरी आपण काहीतरी मिळविल्याचा पराकोटीचा आनंद होता. हृदयात, त्यांच्या रक्तातील प्रत्येक पेशीपेशीतून आपण काहीतरी मिळवल्याची जाणीव स्फुरत होती. आजचा दिवस त्यांच्याही आयुष्यात फार भाग्याचा होता. ज्या यज्ञाला आपण सुरुवात केली, ज्यात आहुति दिली त्याची सांगताही तितक्याच उत्साहाने झाली होती. यावेळी लायन्स क्लबतर्फे प्रत्येक रुग्णाला एक चादर, चष्मा व गॉगल्स भेटरुपाने देण्यात आले. तसेच डोळ्यात घालण्यासाठी औषधांच्या बाटल्याही वाटण्यात आल्या.

पहिल्या वर्षी म्हणजे १९७९ साली एकूण १७५ तर १९८० साली एकूण २०२, व यंदाचे वर्षी २४२ मोती बिंदूची ऑपरेशन्स करण्यात आली. बाबांच्या कृपेने सर्वच्या सर्व यशस्वी झाली. यास साईकृपेशिवाय काहीच म्हणता येणार नाही. यासाठी जिल्हा परिषदेतील नर्सेस तसेच मुंबईतील नर्सेस उपस्थित होत्या. डॉ. सद्री हे मुंबईतील ख्यातनाम डॉक्टर यानी स्वतःला रुग्णांची देखभाल व विचारपूस कर-

ण्यासाठी वाहून घेतले होते. या करिताच दिनांक २८।२।१९८१ रोजी आय. टी. डी. सी. ची एक स्पेशल बस करून मुंबईतील लायन्स क्लबचे सभासद हा सोहळयाचा आस्वाद घेण्यासाठी जातीने हजर होते. आपण जे करू शकलो नाही ते आपल्या बांधवानी साध्य केले आहे. त्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठीच हे सर्व लोक मुंबईहून आले होते. या करिताच फूल ना फुलाची पाकळी म्हणून लायन्स क्लबतर्फे, या सर्व व्यक्तींना, कि ज्यानी खरोखरीच हे सर्व कार्य केवळ कर्तव्याच्या चष्म्यातून न पाहाता आपले वैयक्तिक कार्य आहे या जाणिवेने त्याकडे पाहील, त्यांना एक भेटवस्तू देवून त्यांचा गौरव केला. अध्यक्षस्थान भूषविण्याचा मान मिळाला होता संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. काकरेसाहेब यांना. यांनीदेखील सर्व बंधने बाजूला ठेवून जेवढे म्हणून सहकार्य देता आले तेवढे दिले होते.

तसेच रुग्णांची राहाण्याची सोय केली होती शाळेचे हेडमास्तर यानी शाळा बंद ठेऊन. परंतु नुसते वर्ग देऊन काम भागणारे नव्हते. रुग्णांची सोय करावयाची होती. त्यासाठी गाद्या, चादरी, पलंग इत्यादीची सोय पहाणे अत्यंत जरूरीचे होते. हे फार महत्त्वाचे व तितक्याच आत्मीयतेचे काम करण्याची जबाबदारी होती संस्थानचे श्री. शिंदे यांच्यावर. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कामगिरी फार उत्कृष्टपणे सांभाळली होती. राहाण्याबरोबर आरोग्यही आलेच. त्या कार्यास श्री. कुलकर्णी आरोग्य खाते प्रमुख व त्यांचे सहकारी यानी वाहून घेतले होते. या सर्वांत आणखी एक महत्त्वाचा भाग, तो म्हणजे रुग्णांना दृष्टी प्राप्त झाली होती ही गोष्ट खरी. ह्या दृष्टीस साह्यासाठी दिव्यांची जरूरी होती. ही सर्व सोय श्री. व्ही. एस. कुलकर्णी व त्यांचे सहकारी यानी केली होती. तसेच इ. सी. कोते ह्यांनी संरक्षण व्यवस्थाही उत्तम ठेवली होती. या सर्वांवर मात केली ती शाळेतील मुले व भोजनगृहातील वाढपी मुले यांनी. रुग्णाना सर्व प्रकारची मदत, बाथरुममध्ये नेणे वगैरे शाळेतील अकरावीच्या मुलांनी केली. आपले आईवडीलच आहेत व आईवडिलांची सेवा करणे हेच खरे कर्तव्य व हीच खरी ईश्वरसेवा आहे ही शाळेतील शिकवण त्यानी आपल्या हृदयात खरोखरी कोरली होती. साईबाबांनी सांगितले आहेच सर्व कर्मांत, दानात अन्नदान हे प्रमुख आहे. अन्नाविणा जिव घाबरा होतो. जसा आपलं तसंच दुसऱ्याचं हे जाणून जो दुसऱ्यास अन्नदान करतो तोच ह्या पृथ्वीतलावर पावन होतो. अन्नाविण कोणाला विन्मुख पाठवू नये. अन्नदानासारखे पुण्यकर्म नाही. अन्नाविणा कोणाला माघारी पाठवू नये. अन्नदानाची महती फार थोर आहे. आलेल्या अतिथीला विन्मुख परत पाठवू नये. त्याचा अनादर करू नये. पैसा, वस्त्रदान यापेक्षा अन्नदान श्रेष्ठ आहे. जसे पदकाविण हार, वरणांशिवाय

पक्वान्नाचे ताट, कळसाविण शिखर, कमळाशिवाय सरोवर, प्रेमाशिवाय भजन, कुंकवाशिवाय सुवाशीण, तसेच अन्नदानाविणा जिणं हे व्यर्थ आहे. व त्यातूनही अधिक शक्तिहीन, अंध, पंगू व बधिर यांची केलेली सेवा. यांनाच आधी अन्नदान करावे हेच जास्त महत्वाचे. हे अत्यंत महत्वाचे कार्य केले ते भोजनगृहातील वाढपी मुलांनी. अर्थातच खरे श्रेय आहे ते संस्थानचे कोर्ट रिसीव्हर काकरे साहेब यांना. त्यांनी संस्थानतर्फे हे जेवण व चहापाणी देण्याचे कबूल केले. रुग्णांना अन्न, चहापाणी वेळेवर आहे की नाही तसेच मुले योग्य तऱ्हेने वाढणी करताहेत किंवा नाही, ही सर्व जबाबदारी पार पाडली. भोजनगृह प्रमुख श्री. बाकलीवाल यांनी. हॉस्पीटलमधील कार्याचा व्याप सांभाळून या सर्व कार्यास डॉक्टर देशपांडे व त्यांचे सहकारी यांनी फार मोठा हातभार लावला. अशा तऱ्हेने या नेत्रशिबीराने चौथ्या वर्षात यशस्वीपणे पदार्पण केले. एक गोष्ट प्रामुख्याने व अभिमानाने सांगावीशी वाटते व उल्लेख केल्याशिवाय रहावतच नाही. ती म्हणजे, या सर्वांची एनर्जी होती श्री. जे. सी. मोदी. शिर्डी कार्यालयातील आपली जबाबदारी क्षणभर बाजूला ठेवून पडेल ते काम केवळ कर्तव्य म्हणूनच केले ते श्री. मोदी यांनी. ज्या क्षेत्रांशी आपला अर्थाअर्थी काहीही संबंध नाही अशा क्षेत्रातही त्यांनी आपला तोल जाऊ दिला तर नाहीच परंतु तितक्याच आत्मीयतेने पडेल ते काम केले. पेशंटसनी वर्गणी काढून ज्या डॉक्टर्सनी आपल्याला दृष्टी दिली, व ज्यांच्या सहकार्यामुळे आपण उभे राहिलो त्या नर्सेसना साईबाबांचा आशिर्वादाचा फोटो असलेली एक फ्रेम भेट म्हणून दिली. तसेच ज्या मुलांनीं त्यांची सेवा केली त्या मुलांना पेन्स बक्षीसरूपाने दिली.

"आम्ही दुसरीकडे, दुसऱ्या जागी आहोत ही जाणीव आम्हाला स्पर्शच करू शकली नाही. या सर्वांचे श्रेय आहे, या डॉक्टरसाहेबांना. ज्यांनी आम्हाला गेलेली दृष्टी मिळवून दिली या बालकांना ज्यांनी आमची आईवडीलाप्रमाणे सेवा चाकरी केली. क्वचितसमयी आमची स्वतःची मुलेही करणार नाहीत एवढी सेवा त्यांनी आमची केली. डॉक्टरसाहेब, नर्सेस यांनी आपल्या मुलांप्रमाणे आमची देखभाल केली. तसेच घरच्या सारखे जेवण वाढण्याचे काम भोजनगृहातील मुलांनी केले." असे पेशंटसपैकी काही जणांनी आपले मनातील सर्व विचार अगदी स्पष्टपणे व आत्मियतेने, कळकळीने प्रकट केले.

तुमचा मी भार वाहीन सर्वथा नव्हे हे अन्यथा वचन माझे !
जाणा येथे आहे साह्यास सर्वांस मागे जे जे त्यास ते ते कामे !

सर्व पेशंटसची ऑपरेशन्स यशस्वी व्हावी हे मागणे मागायला बाबांच्या पायी गेले होते डॉ. शिवलकर. यांनी बाबांच्या दरबारी जाऊन सत्यनारायणाची पुजा घातली, मनोभावे पुजा करून, सर्व पेशंटसना प्रसाद दिला.

आपल्या घरी आलेल्या पाहूण्यांचा योग्य तो आदर सत्कार झालाच पाहिजे ही भावना प्रत्येकाच्यांच मनात असते. येणाऱ्या अतिथीला विन्मुख पाठवावयाचे नाही तसेच आलेल्या पाहुण्याचा यथायोग्य आदरसत्कार करावयाचा व कोणाचेही कष्ट फुकट घ्यावयाचे नाहीत ही साईबाबांची सरळ सोपी शिकवण. लायन्स क्लबतर्फे आलेली मंडळी ही साईबाबा संस्थानची पाहुणे मंडळीच होती. त्यांचा यथायोग्य मान ठेवणे हे संस्थानच्या प्रमुख व्यक्तीचे काम. ते काम श्री. काकरे साहेब यांनी तितक्याच प्रेमाने केले.

श्री. पावरी, प्रेसिडेंट लायन्स क्लब मुंबई.
श्री. शेट्टी, प्रेसिडेंट ,, ,, कफ परेड.
श्री. लोलगांणी, प्रेसिडेंट ,, ,, कोपरगाव.
श्री. महेंद्रशहा चेअरमन ,, ,, मुंबई.
डॉ. तेलंग.
डॉ. सरदेसाई.
डॉ. शिवलकर.
डॉ. सद्री. श्री. अरविंद काझी.

इत्यादी प्रतिष्ठीत मंडळीना एक शाल, प्रसाद व श्रीफळ देवून त्यांचा यथायोग्य सत्कार केला. तसेच आलेल्या सभासदांनादेखील प्रसाद हार व श्रीफळ देऊन, त्यांच्याही उपस्थितीची दखल घेतली.


श्रीमती पांडे, श्रीमती देशपांडे, श्रीमती डोळस व श्रीमती मकासरे या जिल्हा-परिषदेतील नर्सेस, तसेच श्रीमती पारेख, श्रीमती राणे, श्रीमती चोपडे, श्रीमती बाणावलीकर या मुंबईतील नर्सेस, यांनी आपला अमूल्य वेळ खर्च करून, या कार्यास हातभार लावला. निस्वार्थी सेवेचा मोबदला म्हणून फुल ना फुलाची पाकळी त्यांना मिळणे अत्यंत आवश्यक होत. ही त्यांची निस्वार्थी सेवा सर्वांच्या दृष्टोत्पतीस आणून देण्याचे काम संस्थानतर्फे संस्थानच्या वरीष्ठ लेखापाल कु. रेखा दिवे यांनी, त्या सर्वांना शाल, श्रीफळ व प्रसाद देऊन केले.

परमेश्वराचे ध्यान, एकतानतेने व परमभक्तिने करा. दुष्ट, घाणेरडे विचार काढून टाका. सदाचार अंगी बाणू द्या. त्यातच तुमचे भले आहे. हीच बाबांची अमृतवाणी. यातच जीवनाचे फार मौल्यवान गुपित दडलेले आहे. बाबा कोण-

तीही गोष्ट मी स्वतः करतो असे म्हणत नसत. स्वतःकडे कधीही मोठेपणा घेत नसत. 'अल्ला मालिक' हेच त्यांच ब्रीदवाक्य. स्वतःला अल्लाचा बंदा सेवक म्हणवून घेण्यातच त्यांची अगाध शक्ति दडलेली होती. मी जे काही करतो ते मी स्वतः करीत नसून कर्ता करवीता एकच आहे. कोणी त्याला राम म्हणतात, तर कोणी रहिम म्हणतात. परमेश्वर एकच आहे. व तो प्रत्येक प्राणीमात्रांच्या ठायी वास करून आहे. तेव्हा सर्व प्राणीमात्रांशी समानतेने व प्रेमळपणाने वागा त्यातच तुम्हाला परमेश्वर भेटेल हीच बाबांची खरी शिकवण या नेत्रशिबिराचे आयोजन करणाऱ्या सूत्रधाराच्या मनात दडलेली दिसली. याचे खरे सूत्रधार होते मुंबईचे लायन श्री. महेंद्र शाह ज्यांनी वारंवार शिर्डीस जाऊन या सर्व कार्यक्रमाची उत्तमपणे आखणी केली व कार्यक्रम जास्तीत जास्त यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. योगायोग असा की त्याच दिवशी त्यांनी आपल्या वयाची ४९ वर्षे पूर्ण करून पन्नासाव्या वर्षात पदार्पण केले.

श्रीसाईबाबांच्या पुण्यनगरीत आयोजित केलेल्या या नेत्रयज्ञाची यथोचित सांगता झाली ती केवळ श्रीसाईबाबांच्या आशिर्वादाने, प्रेरणेने व अलौकिक शक्तिनेच यात वादच नाही. म्हटलेच आहे ना,

ज्याची सुरवात गोड त्याचा शेवट ही गोड.



नेत्रदान शिबिरात डॉ. अरुणकुमार शिवलकर शस्त्रक्रिया करीत असून लायन श्री. महेंद्र शहा मदतीसाठी उभे आहेत.

# श्रीसाईबाबांचे दरबारी २५ वर्षें सेवा

—कु. रेखा दिवे

दि. २२।३।८१ हा दिवस संस्थान कर्मचाऱ्यांचा अत्यंत आनंदाचा दिवस होता. या दिवशी आपल्यातील ज्या लोकांनी साईदरबारी २५ वर्षें सेवा केली, त्यांचा सत्कार करण्याचे सर्व कर्मचाऱ्यांतर्फे ठरले होते. ज्या कर्मचाऱ्यांची संस्थानमध्ये २५ वर्षें नोकरी पूर्ण झाली त्या सर्वांना त्यांनी केलेल्या सेवेची आठवण करून देण्याची गोड कामगिरी संस्थान कर्मचाऱ्यांनी या शुभदिनी बजावली. त्यात भर पडली होती ती सर्व नोकरांना पितृतुल्य असणाऱ्या, आमचे आवडते, आमचे चहाते माजी कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांच्या उपस्थितीने, आमचे पाठकसाहेब हे अजूनही सर्वांना हवेहवेसे वाटतात. त्यांनी संस्थान नोकरांचे फक्त भले कसे होईल हेच पाहिले. संस्थान नोकरांना सरकारी दर्जाप्रमाणे पगार देण्याचे कार्य पाठकसाहेबांनीच पार पाडले होते. दुधात साखर पडली ती. मा. पारेखसाहेब यांनी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण स्वीकारले होते त्यामुळेच. मा. पारेख साहेबांबद्दल ही संस्थान कर्मचाऱ्यांच्या मनात आपुलकीची वेगळीच भावना असल्यामुळे त्यांच्या उपस्थितीमुळे सर्वांचा आनंद द्विगुणीत झाला. दोन्ही व्यक्ती घरातल्याच, त्यामुळेच उत्साहाने सर्व कर्मचारी या कार्यक्रमात भाग घेत होते. व कार्यक्रम जास्तीत जास्त यशस्वी करण्याचा आटोकाट प्रयत्नही करत होते. मोठ्या माणसांचे आशिर्वादच मनुष्याला आयुष्यभर साथ देत असतात. मोठ्या माणसांच्या आशिर्वादावरच माणसाच्या आयुष्याची बरीचशी वाटचाल अवलंबून असते. रौप्यमहोत्सवी वाटचालीत या सुवर्ण योगामुळेच भर पडली.

ज्या संस्थान कर्मचाऱ्यांचा सत्कार केला, त्यातील फक्त तीनच कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. इतर दहा लोक अजुनही बाबांच्या सेवेचा लाभ घेतच आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना, इतर नोकरांचे वतीने, एक ताट, एक तांब्या, पेला व दोन वाट्या अशी एक अल्पशी भेट देण्यात आली व सर्वांनी ती निश्चितपणे गोड मानून घेतली. आपली आठवण आपल्या सहकारी वर्गाला असल्याबद्दलच त्यांना अधिक धन्यता वाटत होती. हे समाधान, निवृत्त व्यक्तींच्या चेहऱ्यावर जास्त दिसत होते. आम्ही जरी निवृत्त झालो असलो तरी संस्थान कर्मचारी संघटनेचा एक अवयव आहोत, याची जाणीव ठेवल्याबद्दल त्यांना अतोनात धन्यता वाटत होती. प्रथम मा. पारेखसाहेब यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यास हार घातला, नंतर सौ. निर्मलाबेन

पारेख यांनी त्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव केला. बाबांचा आशिर्वाद देण्याचे माध्यम होत श्री. का. सी. पाठकसाहेब. त्यांचे हातून बाबांचा नारळ व प्रसाद घेताना प्रत्येक कर्मचाऱ्याला एक वेगळा अभिमान वाटत होता. व आपल्या सेवेचे सार्थक झाल्याचे समाधान वाटत होते. प्रत्येकजण मा. पाठकसाहेबांच्या पाया पडत होता. यावरूनच आपल्याला पितृतुल्य असलेल्या व्यक्तिकडून आशिर्वाद घेताना डोळ्यात एक वेगळीच चमक दिसत होती. मनात खोलवर कुठेतरी दडून बसलेली त्यांच्याबद्दची आपुलकी दृष्टोत्पतीस येत होती. आपला गौरव केल्याबद्दल त्यांना निश्चित अभिमान वाटत होता. मा. पाठकसाहेब यांचा प्रेमळ हात पाठीवरून फिरल्यामुळे त्याला अधिक उठाव आलेला होता. श्री. डी. सी. पाटील यांनी एकामागून एकेक नावे पुकारली व प्रत्येकाने भेटवस्तूंचा स्वीकार केला.

आजचा पहिला मान होता श्री. रंगनाथदादा गुरव यांचा. बाबांच्या सान्निध्यात वावरलेली, उंच बांधा व मोठ्या मिशा, तसेच चेहऱ्यावर समाधान असलेली ही व्यक्ती सन १९२२ पासून संस्थानसेवेत होती. सन १९७८ साली ते संस्थानसेवेतून निवृत्त झाले. बाबांच्या मंदिरात तसेच पालखीच्या वेळी दिवाबत्ती लावण्याचे मुख्य काम रंगनाथदादांचे असे. दिवाबत्तीचे काम करण्यात ही व्यक्ती मंदिराच्या आवारातील खोलीत सतत गढलेली असे. श्री साईबाबांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे नोकरीकडे सेवा या दृष्टीनेच पाहणारी ही व्यक्ती आपले काम कर्तव्य दृष्टीने अत्यंत चोख करीत असे. यात कुठेही व्यवहार दिसत नव्हता, होती ती फक्त साईभक्ती व बाबांच्या सेवेची ओढ.

नंतर श्री. तुकाराम परदेशी यांचा सत्कार करण्यात आला. श्री. तुकाराम परदेशी संस्थान सेवेत सन १९४२ मध्ये रुजू झाले. यांना सर्वजण 'बुवा' म्हणूनच संबोधतात. खरे पांडुरंगाचे भक्त कोणतेही काम आनंदाने स्वीकारणारी ही व्यक्ती, परंतु 'शिरडी माझे पंढरपूर' या बाबांच्या चमत्काराचा प्रत्यय बुवांच्या वागणुकीतून प्रत्ययास येतो.

नंतर होते श्री. छगनभाई चांदभाई शेख. विहीरीतील पंपाचे काम करणारी ही व्यक्ती संस्थानमध्ये सन १९४६ मध्ये आली. स्तंपवेलचे काम करणे, बरोबर थोडी फार शेतीही करणे ही कामे छगनभाई यांचीच होती. परंतु त्यातही साई सेवेचा अंशच जास्त होता.

त्यानंतर परिचय झाला तो श्री. दिगंबर जाखडी यांचा. ते सन १९४७ पासून संस्थान सेवेत आहेत. विशेष उल्लेखनीय किंवा आदराची गोष्ट अशी की,

श्रीसाईबाबांचे वेळेपासून असलेले नानूमामा. ते बाबांची नित्यनेमाने आरती करीत असत, त्यांचे हे चिरंजीव. यानाही साईबाबांचे दरबारी मंदिराचे प्रमुख पुजारी होण्याचा मान मिळाला. ही श्रींचीच इच्छा. देह हा नाशिवंत आहे. नानुमामा जगरहाटी प्रमाणे स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांचीच सेवा, त्यांचे मुलाकडून श्रीसाईबाबांनी करून घेतली.

हरिभाऊ बाळा शिंपी, मंदिरातील चोपदार, अत्यंत शांत वृत्तीची व्यक्ती, बाबांचे दरबारात केवळ पूर्वपुण्याईनेच रहाण्याचा मान मिळालेले हरिभाऊ दि. १०–१०–५१ रोजी बाबांचे सेवेत रुजू झाले व सन १९७८ रोजी सेवानिवृत्त झाले.

एकनाथ चंद्रभान कोते, दि. ७–६–५२ पासून आजतागायत संस्थान सेवेत आहेत. संस्थानचा पसारा दिवसेंदिवस वाढतच आहे त्याबरोबरच स्थावरजंगमही वाढत आहे. या वाढत्या व्यापाचे संरक्षण करण्याची जबाबदारी श्री. एकनाथ चंद्रभान कोते पार पाडत आहेत.

पुंजा काळू धीवर दि. ७–६–५२ पासून संस्थान नोकरीत असून, आजतागायत स्वच्छता कामगार म्हणून काम करीत आहेत. सकाळी ४ वाजता आपले कामावर हजर होऊन वरीष्ठ सांगतील ते काम आनंदाने स्वीकारायचे व बाबांच्या सेवेत अधिकाधिक भर पाडावयाची हेच यांचे कर्तव्य असे ते मानतात. त्यांच्या अंगावरील पांढऱ्या शुभ्र कपड्यावरून त्यांच्या मनाचा स्वच्छपणा दिसून येतो.

पूर्वी शिर्डी परिसरात विजेच्या दिव्यांची सोय सर्व ठिकाणी नव्हती. संस्थानने एक विद्युतगृह सुरू केले. यांचे प्रमुख म्हणून दि. १–३–५४ रोजी श्री. वसंतराव शंकरराव कुलकर्णी यांची नेमणूक करण्यात आली. विशेष शिक्षण नसलेले हे व्यक्तिमत्व परंतु केवळ साईप्रेरणेने व साईकृपेनेच एवढा धोका पत्करू शकली. आजतागायत सर्व संस्थान परिसरांत दिव्यांचा झगमगाट कायम टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न ते करीत असतात. कोणतेही काम तत्परतेने स्विकारत असतात.

यांना साथ देतात ते त्यांचे सहकारी श्री. एकनाथ राधाकिसन महाले. हे दि. १–१–५५ रोजी या विद्युत गृहात नोकरीस लागले. व आजतागायत श्री. कुलकर्णी यांना हा भार संभाळण्यास मदत करीत आहेत.

श्री. चांदखा लाडखा शेख यांनी १–७–५५ रोजी बाबांच्या सेवेस प्रारंभ केला. अजूनही त्यांना या सेवेचा लाभ मिळत आहे. कधीही न चिडणारी, शांत वृत्तीची ही व्यक्ती संरक्षण खात्याची आपली सेवा बजावण्यात कधीही कसूर करीत नाही.

तीच गोष्ट आहे श्री. संतू साबळे यांची. कोणतेही काम द्या, ते आनंदाने स्विकारणे हेच यांचे ध्येय आहे. कधी शिपाई म्हणून तर कधी संरक्षण खात्यातील नोकर म्हणून यांनी आपली कामे चोखपणे बजावलेली आहे. तीच गोष्ट दिसून येते. श्री. बाबुराव झिरूस ठाकूर यांच्या स्वभावात. पडेल ते काम शांतचित्ताने मन लाऊन करतात.

सर्वात शेवटी सत्कार करण्यात आला तो आमचे सर्वांचे आधारस्तंभ, सर्वांचे अत्यंत लाडके व हवेहवेसे वाटणारे, तसेच अष्टपैलू व्यक्तीमत्व असलेले आमचे श्री. आपटेसाहेब. यांचा सत्कार कोणत्याही प्रकारे कराल तेवढा कमीच. सर्व कर्मचारी वर्ग हा माझा बंधुवर्गच आहे ही भावना सतत मनात बाळगणारी ही व्यक्ती, खरोखरीच साईबाबांचे सान्निध्यात असणं. अत्यंत आवश्यकच आहे.

सर्वगुण संपन्न असलेली ही व्यक्ति दिसायला खरोखरीच लहान परंतु थोर व्यक्तिमत्व असलेली, सर्वांना समान मानणारी, भेदभाव कधीहीं अंगी न बाळगणारे आमचे आपटेसाहेब हे सर्वांनाच आपलेसे वाटतात. प्रत्येकाच्या अडीअडचणीतून काहीना काही मार्गदर्शन सतत करत असतात. आपली मुल व दुसऱ्यांची मुल हा भेदभाव तर त्यांना कधीही शिवला नाही. संस्थानमध्ये नोकरी करणाऱ्या प्रत्येक मुलाच्या मागे लागून त्यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणे हेच आपले आद्य कर्तव्य ते समजतात. वेळप्रसंगी त्याकरीता लागणारी मदतही करतात. प्रत्येकाने शिक्षण हे घेतलेच पाहिजे, आज शिकलात तरच उद्या नाव कमवाल, संस्थानमधील नोकरी ही अळवावरच पाणी आहे. तेव्हा आपल हित साधायच असेल तर शिक्षण घ्या व दुसरीकडे चांगली नोकरी मिळवून नावलौकिक मिळवा. हीच आमच्या आपटेसाहेबांची सर्व मुलांना शिकवण असते.

समोरच्या व्यक्तीस जास्तीत जास्त प्रोत्साहन देऊन त्या व्यक्तीच्या उत्कर्षाची आस धरणारी व्यक्ती केवळ साईकृपेमुळेच संस्थान नोकरांना लाभली. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून आनंद मानणाऱ्या तसेच दुसऱ्याला जास्तीत जास्त मदत करून त्याचा उत्कर्ष करून देणाऱ्या अशा व्यक्ती फारच क्वचित आढळतात.

ट्रस्टीच्या काळापासून दि. २६–२–५५ रोजी श्री. आपटेसाहेब हे संस्थान सेवेत रुजू झाले. प्रथम अकौन्टस् क्लार्क म्हणून संस्थानमध्ये नोकरीस आलेले आज संस्थानचे मुख्य लेखाधिकारी होण्याचा हा बहुमान त्यांना मिळाला तो केवळ त्यांच्या गोड व निरिच्छ स्वभावामुळे, विशाल मनोवृत्तीमुळेच.

ट्रस्टीच्या काळातही त्यांचे बऱ्याचवेळा मतमेद झाले. परंतु आजतागायत केवळ व्यवहाराच्या चष्म्यातून, कोणाही व्यक्तीकडे न बघता प्रत्येक व्यक्तीशी घनिष्ट संबंध व मित्रत्वाचे नाते त्यांनी कायम टिकवुन ठेवले. कोणाशीही मतभेद नसलेली ही व्यक्ती सर्वांना आपलीशीच वाटते. यांचा सत्कार करण्यासाठी मुंबईहून बरीच थोर मंडळी, संस्थानचे आर्किटेक्ट श्री. तलगिरी व श्री. आठल्ये, कॉन्ट्रॅक्टर श्री. बागवे, श्री. वाघ, श्री. देवशिभाई श्री. सटाणकर तसेच त्यांचे सहकारी, इन्कमटॅक्स कन्सलटन्ट श्री. जोशी, तसेच प्रिंटर्स श्री. मोरे इ. मंडळी आपल्या ठिकाणी श्री. आपटेसाहेब यांचेबद्दल असलेली भावना प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे व्यक्त करण्यासाठी मुद्दाम शिर्डीस आली होती. त्यांचेतर्फे श्री. तलगिरी यांनी श्री. आपटेसाहेब यांना एक भेट वस्तू अर्पण केली. त्यात कोणत्याही प्रकारचा व्यवहार किंवा देवाणघेवाण नव्हती; यात होता फक्त प्रेमभाव. यात एकमेकांविषयींच्या आपुलकीची ओढ साठलेली होती.

आपण ज्या देवाची नोकरी करतो आहोत तीच खरी ईश्वराची सेवा आहे असा त्यांचा विश्वास आहे. याकरिता देवळात जाण्याची जरुरी नाही असे ते मानतात. पूर्वसंचितानुसार ऐहिक सुखदुःखे मनुष्यास भोगावीच लागतात, नशिबी आलेले कोणालाही टाळता येत नाही. याकरिता दुःख, करीत बसण्यापेक्षा आपले कर्तव्य करण्यातच ते धन्यता मानतात. आलेल्या दुःखात अत्यंत आनंदाने व धीराने सामोरे-जाणे हाच एक सोपा पर्याय आहे. जे आहे त्यातच आनंद मानणे, माझ्यावर आलेले प्रसंग म्हणजेच माझी बाबांशी चाललेली झुंज आहे. हार किंवा जीत ही अटळ आहे. तेव्हा कोणतीही गोष्ट मनाला लावून न घेता त्यातून मार्ग कसा काढता येईल याचाच ते सतत विचार करीत असतात. यातून मार्ग काढणारा वाटाड्या एकच, तो म्हणजे परमेश्वर अशीच त्यांची श्रद्धा आहे.

अशा तऱ्हेने या छोटयाश्या परंतु गोड कार्यक्रमाची सांगता झाली ती सह-भोजनाने. सर्व कर्मचारी वर्गासाठी एक वेगळा भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम लेंडिबागेतील हिरवळीवर आयोजित करण्यात आला होता. बाबादेखील रोज नित्यनेमाने लेंडिवर जात असत. तेव्हा त्यांच्या सेवेत २५ वर्षे नोकरी केलेल्या या कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभदेखील लेंडिबागेत करणे उचितच होते.

☆

# श्री साईबाबांच्या (हयातीत) होत असलेला पालखी सोहळा

—सौ. उषा प्रभाकर मुळे
साईनाथ माध्यमिक विद्यालय शिरडी
जिल्हा नगर

साऱ्या संतांची महती त्यांच्या छळा नंतरच ते वैराग्यशाली सत्पुरुष आहेत. हे नास्तीकाना कळते.

श्री साईबाबा द्वारकामाईतून एक दिवसा आड चावडीत झोपत होते, चावडी म्हणजे ग्रामस्थांचे गप्पा मारण्याचे ठिकाण, त्या ठिकाणी बाबा ½ जागेत झोपत असत. १९०७ मध्ये अण्णा चिंचणीकरानी दरवर्षीचे उत्पन्न चावडी करीता दिले. चावडीचा हक्क देवस्थानकडे आला व बांधकाम झाले. त्याची व्यवस्था रघुवीर भास्कर पुरंदरे यांनी केली. त्या काळी ग्रामस्थ रात्री चावडीत पत्ते खेळणे, सोंगट्या खेळणे वगैरे चालू असत. त्यामुळे श्रीबाबांना शांत झोप येत नसे.

पहाटे बाबा द्वारकामाईत जात असत, त्यावेळी त्यांचे कपडे घेऊन महादू श्री. माधव फसले हा मशीदी पर्यंत घेऊन जात असे. पुढे बाबा शौच मुखमार्जन करण्यासाठी उत्तर दिशेला वडाचे झाड होते तेथे जात असत. नंतर सध्या असलेल्या शनी देवळाजवळ पाणी होते. तेथे हात-पाय धूत. नंतर द्वारकामाईत पूर्वेस मुख करून बसत होते. सध्या धुनीचा जो खांब (पावले असलेला) त्याला टेकून बसत व धुनी प्रज्वलित करीत.

दुसऱ्या दिवशी नित्याप्रमाणे चावडीत जाण्याच्या अगोदर, ८ वाजता तात्या कोते पाटील व बाबा एकत्र न्याहरी करीत असत. (रात्री) नंतर चावडीत जाण्याचा सोहळा होत असे. तो सोहळा असा—म्हाळसापती व तात्या पाटील कोते यांनी बाबांच्या दंडाला धरून उठवावे, बाबांच्या बगलेत चंदनाचा सोटा आणि डाव्या हातात तंबाखूची पोटली व चिलीम द्यावी, नंतर महादू फसले यास मांजरपाटाची धोतरे घड्या एकंदर ३५ घ्यावयास सांगावे. त्याने त्या घड्या पालखीत ठेवाव्या.

नंतर म्हाळसापती व तात्या पाटील यांनी बाबांच्या दंडाला धरून पायरीपर्यंत आणावे. तेथे चोपदार बाळाभाऊ शिंपी, नाना चोपदार, नानाभाऊ कुलकर्णी, ललकारी देत. ती अशी—"बाबा आस्ते कदम" म्हणून नमस्कार करीत. सर्व पायऱ्या

उतरल्यावर बयाजी पाटील जरीची छत्री श्रीबाबांच्या डोक्यावर धरीत होते. नंतर भक्त लोक चवरी मोर्चेल अबदागिर बाबांच्या डोक्यावर धरीत. त्यावेळी पायरी पासून चावडीपर्यंत भक्त उत्तम गुलाबी रंगाच्या उंची वस्त्राच्या पायघड्या घाली व त्यावरून या देवाची स्वारी हळूहळू आनंदाने डोलत निघत असे. सर्वात पुढे राहल्याचा बँड तुतारीशिंग ताशा या वाद्यंत्र्याच्या नादात देवाची स्वारी खूष असे. मशिदीची द्वारकामाईच्या पुढे चावडीपर्यंत दोन्ही बाजुनी उजेडा करिता सुमारे २०० हिलाल (टेंबे) लागत असत व बत्त्या ५।६ असत. पालखीपुढे शामकर्ण घोडा, त्याच्या अंगावर जरीची सजविलेली उत्तम झूल असे. पायात चांदीचा तोडा असा हा घोडा नाचत असे. नंतर वेशीच्या समोर आल्यावर श्री बाबा मारुतीच्या समोर उभे राहून काही तरी हस्तसंकेत दोन मिनिट करीत. नंतर चावडीजवळ आल्यावर चोपदार ललकारी देत "आस्ते कदम" महादू फसले बाबांच्या कपड्याच्या घड्या घेऊन चावडीत आरशाला टेकून ठेवीत असत. त्या कपडयाला टेकून बाबा बसत. तात्या पाटील व भक्त म्हाळसापती हे जवळ बसत. त्या वेळी बापूसाहेब जोग यांनी पूजेची तयारी करावी. गंध, अक्षता वगैरे आरती घेण्याची वेळ आली की तात्या पाटील यांनी श्रीमंत बुटीने दिलेला नवरत्नाचा हार आणि त्याला जोडून फुलांचा हार श्रींच्या गळयात घालीत. नंतर बापूसाहेब जोगांनी आरती करावी. त्यावेळी बाबा चिलीम ओढीत व म्हाळसापती यांना देत. त्यांनी नमस्कार करून ती परत द्यावी त्यावेळी बाबा शांत बसत. नंतर प्रसाद वाटप होई. बाबा आपल्या इच्छेप्रमाणे बिछाना तयार करीत. तो असा-कपडयाच्या १५ घडया खाली निजावयास २० घडया डोक्याखाली घेत. हा त्यांचा बिछाना महत्वाचा होता. ½ जागा सोडून बाकीच्या जागेत भक्त झोपत होते. नंतर पहाटे काकड आरती जोग करीत. आरती झाल्यावर बाबा द्वारकामाईत जात. देवस्थानच्या सर्व शोभेच्या वस्तू राधाकृष्ण नावाच्या बाईंनी धनवान लोकांच्याकडून मिळविल्या आहेत, व संस्थानला चांगले स्वरूप दिले.

असा हा सोहळा प्रत्यक्ष पाहिलेले बाप्पाजी रत्न पारखी शिर्डीला हयात आहेत त्यांच्याकडून मिळविलेली ही सत्य घटना आहे.

---

**चुकीची दुरुस्ती**– श्रीसाईलीला मार्च ८१ अंकात मा. राज्यपाल यांची शिर्डीस भेट या लेखात, पान क्र. १७ वर १८ व्या ओळीत दि. ३१-३-८१ असे छापले गेले आहे. त्याऐवजी दिनांक ३१-१-८१ असे वाचावे झालेल्या चुकीबद्दल आम्ही दिलगिर आहोत. —संपादक

# शिरडी-वृत्त माहे फेब्रुवारी सन १९८१

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साई भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रीच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :

कीर्तन : १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) सौ. कलावती चव्हाण मुंबई यांचे कीर्तन झाले.

प्रवचन : १) ह. भ. प. श्रीराम दि. परचुरे यांचे प्रवचन झाले.

२) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाकचौरे यांचे प्रवचन झाले.

साईलीला मासिक, लेखक कवि संमेलन ७ वे. काव्य गायन—

१) सौ. कलावती चव्हाण मुंबई. २) सर्वश्री नागेश मोगलाईकर धुळे ३) बापूसाहेब निरखे इंदूर. ४) सौ लीलाताई मराठे धुळे. ५) प्रकाश कर्पे इंदूर. ६) एन. जी परुळेकर मुंबई. ७) नारायणराव गोखले मुंबई. ८) द. म. मोरे पुणे. ९) डी. बी. पोतनीस पिंपरी. १०) हसमुख ओंकार पाटील. ११) बाळ चावरे मुंबई. १२) ए. पी. त्रिपाठी बैतुल. १३) जे. के. पुरी चंदीगड. १४) श्रीमती डॉ. इंदुताई नाईक लोणावळा. १५) रमेश डी. चव्हाण नवापूर. १६) मधुकर सी. मंडलीक नवापूर. १७) डॉ. सुमतीताई खानविलकर लोणावळा. १८) प्रभाकर कोळमकर बोरीवली. १९) गुंडोपंत पटवारी बिदर. २०) कु. राहुल खानबिलकर लोणावळा. २१) जगदीश देवपूरकर धुळे. २२) विजय डी. चव्हाण नवापूर. २३) शांतीलाल दवे नवापूर. २४) रघुनाथराव सांडभोर पुणे. २५) नितीन शां. मिराणे शिरडी २६) कु. मंगला माडीवाले मुंबई. २७) साईनाथ खडके मुंबई. २८) मधुसुदन द. गौतम मुंबई. २९) ग. रा. पालकर मुंबई. ३०) रमाकांत पंडीत मुंबई. ३१) सौ. शांताबाई अं. सरोदे मुंबई. ३२) सुनिल सरोदे मुंबई. ३३) श्रीमती लीलाताई गुजराथी शिरडी. ३४) राधाकृष्ण गुप्ता मुंबई. ३५) परशुराम अंबरे मुंबई. ३६) जगन्नाथ कुलकर्णी पुणे. ३७) विजय हजारे मुंबई. ३८) अनिलकुमार लुतडे वर्धा. ३९) सौ. शशिकला रेवणकर मुंबई. ४०) श्रीराम सातर्डेकर मुंबई. यांचे काव्यगायन झाले. ४१) अजित म. पावसकर मुंबई. ४२) भक्तराज महाराज इन्दौर. ४३) वसंतराव धारकर मुंबई. ४४) रामजीभाई निर्गुडकर इन्दौर. ४५) कु. शिलाताई शेलार ठाणे. ४६) वामन ग. जोग इन्दौर. ४७) एम्. एन्. पद्मराव सिकंदराबाद. ४८) के. व्ही. गोपालकृष्ण विशाखापट्टण. ४९) सौ. के. व्ही. सावित्रीदेवी, विशाखापट्टण. ५०) मेघराजजी जयसिंगाणी उल्हासनगर. ५१) गुरुजी बैतूल ५२) वैभवकला दरबार कोल्हापूर. ५३) इंडियन सोसायटी फॉर मेन्टली रिटार्डेड मुंबई. ५४) ए. आर. शांतीकुमार हैद्राबाद. ५५) साईसेवा मंडळी विजयवाडा. ५६) गणेश भजनी मंडळ काछियाना (जबलपूर) ५७) कु. कुंदा दक्षी भोपाळ. ५८) के. व्ही. रामा-


ग्रामुर्ती काठीवाडा. ५९) विश्वनाथ या. भोसले. कोपरगाव ६०) युनियनवार भजनी मंडळी मुंबई.

## भव्य नेत्रदान शिबीर

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी व लायन्स क्लब मुंबई कफपरेड—कोपरगाव द्वारा श्रीसाईनाथ हॉस्पिटल शिरडी येथे दिनांक २२–२–८१ ते २८–२–८१ पर्यंत नेत्रदान शिबीर आयोजित केले होते.

नेत्रतज्ञ डॉ. तेलंग, डॉ. शिवलकर, डॉ. सरदेसाई, डॉ. विजूर, डॉ. बारस्कर यांनी २३६ मोतीबिंदू व ६ किरकोळ अशा एकुण २४२ शस्त्रक्रिया केल्या. सर्व रुग्णांना श्रीसाईबाबा संस्थान तर्फे रोज दोन वेळा भोजन व चहा मोफत देण्यात आला. समारोपाचे दिवशी लायन्स क्लबने सर्व रुग्णांना गॉगल, चष्मे, औषधे व शाल देऊन रुग्णांचा सत्कार केला. रुग्णांनी श्री साईबाबा संस्थान व लायन्स क्लबचे आनंदाश्रूने आभार मानले.

**हवापाणी:**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.



महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. ओमप्रकाश मेहरा यांनी श्री साईबाबा संस्थान शिर्डीस भेट दिली त्यावेळी कोर्टरिसिव्हर श्री. काकरेसाहेब त्यांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार करीत आहेत. शेजारीच त्यांच्या पत्नी सौ. सत्यादेवी मेहरा व जवळच मंदिर व्यवस्थापक श्री. विठ्ठलराव बागवे